



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६






मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०५९ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# निवडणूक आयोगाची शाई सुकली की निघत नाही

## मार्करचा 2011, तर 'पाडू'चा 2004 पासून वापर; आयुक्त दिनेश वाघमारेंचे स्पष्टीकरण

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

मुंबईसह राज्यभरातील महापालिका निवडणुकीत मतदारांच्या बोटाला लावण्यात येणारी शाई पुसली जात असल्याचे आरोप राज्य निवडणूक आयुक्तांनी जोरकसपणे फेटाळून लावलेत. राज्य निवडणूक आयोग मार्कर पेन 2011 पासून वापरत आहे. ही शाई बोटावर लावण्यासाठी तिला सुकण्यासाठी 10-12 सेकंद लागतात. एवढा वेळ मतदार मतदान केंद्रातच असतो. त्यामुळे शाई पुसली जाण्याची कोणतीही शक्यता नाही, असे त्यांनी म्हटले आहे. सोबतच पाडू या यंत्राचा 2004 पासून वापर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात मुंबईसह 29 महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. काही किरकोळ अपवाद वगळता सर्वत्र शांततेत मतदान सुरू आहे. त्यातच काही ठिकाणी मतदारांच्या बोटाला लावण्यात येणारी शाई पुसली जात असल्याच्या तक्रारी केल्या जात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या प्रकरणी निवडणूक आयोगावर टीकेची झोड उठवली. त्यानंतर राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्वतःहून पत्रकारांना सामोरे जात शाई पुसली जात असल्याच्या आरोपांत कोणतेही तथ्य नसल्याचे स्पष्ट केले.

दिनेश वाघमारे म्हणाले, राज्य निवडणूक आयोग मार्कर पेन 2011 पासून वापरत आहे. ही शाई बोटावर लावल्यानंतर त्याला सुकण्यासाठी 10 ते 12 सेकंद लागतात. मतदार एवढा वेळ संबंधित मतदान केंद्रावरच असतो. एकदा ही शाई वाळल्यानंतर ती कोणत्याही प्रकारे काढता येत नाही. ही शाई वेगळी नाही. भारतीय निवडणूक आयोग जी शाई वापरतो, तीच ही शाई आहे. एखादा मतदार एकदा मतदान केल्यानंतर पुन्हा मतदान केंद्रावर आला, तर तेथील निवडणूक अधिकारी निश्चितच त्याच्यावर कारवाई करतात.



शाई पुसली जात असल्याविषयी केवळ संभ्रम निर्माण केली जात आहे. ही शाई 2011 पासून आम्ही मार्कर पेनच्या स्वरुपात वापरत आहे. त्यामुळे याच निवडणुकीत अशा प्रकारचा संभ्रम पसरवणे चुकीचे आहे. याशिवाय लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीतही अशा प्रकारच्या तक्रारी आल्या होत्या. पण शाई वाळल्यानंतर ती पुसली जात नाही.

मतदान कक्षात मतदान प्रतिनिधी आहेत. ते उमेदवारांचे प्रतिनिधित्व करतात. ते संबंधित प्रभागातीलच असतात. त्यामुळे त्यांना असा एखादा प्रकार आढळून आला तर त्याच्यावर निश्चितच कारवाई होईल. या प्रकरणी आयोग चौकशी करेल. पण ही शाई पुसली जात नाही असा आमचा दावा आहे असे ते म्हणाले.

### आमची कुणाचीही शाई पुसली गेली नाही

आयुक्त वाघमारे म्हणाले, शाई पुसण्यासाठी नेलपेन्ट रिमूव्हर व सॅनिटायझरचा वापर केला जात असल्याची तक्रार आहे. शाई तासाभरानंतरही पुसली जात जात आहे. पत्रकारांनी ही गोष्ट निवडणूक आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर त्यांनी ही गोष्ट फेटाळून लावली. आम्ही पूर्वीपासूनच कोरस कंपनीचे मार्कर पेन वापरत आहोत. त्यामुळे शाई पुसली जात असल्याचे आरोप चुकीचे आहेत. आमच्या कार्यालयातील सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मतदान केले. त्यापैकी कुणाचीही शाई पुसली गेली नाही. मुंबईसह सर्वच ठिकाणी दुबार मतदारांची ओळख पटल्याशिवाय मतदान करू दिले जात नाही. दुबार मतदारांना दोन ओळखपत्र मागितले जात आहेत.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी ५८ टक्के मतदान

## १२६ जागांवरील ६९२ उमेदवारांचे भवितव्य मतदान यंत्रांत बंद

**पिंपरी : (समर्थ गांवकरी)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत गुरुवारी (दि. १५) सरासरी ५८ टक्के मतदान झाले. महापालिका निवडणुकीत ३२ प्रभागांतील १२८ जागांपैकी दोन जागा बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यामुळे उर्वरित १२६ जागांसाठी एकूण ६९२ उमेदवार रिंगणात आहेत. त्यांचे भवितव्य मतदान यंत्रात (ईव्हीएम) बंद झाले. आज (शुक्रवारी) आठ केंद्रांवर मतमोजणी होणार आहे.

महापालिका क्षेत्रात एकूण १७ लाख १३ हजार ८९१ मतदार असून त्यात ९ लाख ५ हजार ७२८ पुरुष, ८ लाख ७ हजार ९६६ महिला व १९७ इतर मतदारांचा समावेश आहे. एकूण २,०६७ केंद्रांवर मतदान झाले. सकाळच्या




टप्प्यात मतदारांचा प्रतिसाद कमी होता. मात्र, सकाळी नऊनंतर मतदानाचा टक्का हळूहळू वाढत गेला. काही ठिकाणी तांत्रिक अडथळे आणि प्रशासकीय गोंधळाचे प्रसंग घडले असले तरी संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली.

सकाळी ७:३० वाजता प्रत्यक्ष मतदानाला सुरुवात झाली. मात्र, सकाळच्या सुरुवातीच्या टप्प्यात नेहरूनगर, सांगवी, भोसरी, मोशी, चिखली, निगडी आणि चिंचवडगाव येथील काही मतदान केंद्रांवर ईव्हीएममधील मॉक पोल व तांत्रिक कारणांमुळे अडथळे आले. त्यामुळे काही काळ मतदान प्रक्रिया थांबवावी लागली. निवडणूक प्रशासनाने तात्काळ पर्यायी यंत्रे उपलब्ध करून देत मतदान सुरळीत केले.

मतदान केंद्रांमध्ये मोबाइल फोन नेण्यास घातलेल्या बंदीवरून काही ठिकाणी वादाचे प्रसंग घडले. मतदानासाठी आलेल्या काही मतदारांनी मोबाइल सोबत नेण्यास परवानगी देण्याची मागणी केली. मात्र, निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार मतदान केंद्राच्या आत मोबाइल नेण्यास मनाई असल्याचे स्पष्ट करत कर्मचाऱ्यांनी नियमांची अंमलबजावणी केली.

महापालिका निवडणुकीची मतमोजणी शुक्रवारी (दि. १६) सकाळी १० वाजता सुरु होणार असल्याची माहिती आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली. महापालिका हद्दीतील निश्चित केलेल्या आठ ठिकाणी मतमोजणी होणार असून मतमोजणी केंद्रांवर ओळखपत्र असलेल्या अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार आहे. मतमोजणीदरम्यान वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था तसेच प्रसारमाध्यमांसाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था करण्यात आली आहे. निकाल जाहीर करताना संगणकीय प्रणालीद्वारे अचूकता व पारदर्शकता राखली जाणार आहे.

# पुण्यात भाजपाच राहणार की, राष्ट्रवादी बसणार सत्तेत?

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या पक्षांसाठी अत्यंत प्रतिष्ठेच्या असलेल्या पुणे महापालिकेत कोण सत्तेवर बसणार, याचे उत्तर काही तासांतच मिळणार आहे. मात्र, त्यापूर्वी समोर आलेल्या एक्झिट पोलने निकालाचे अंदाज मांडले आहेत. दोन एक्झिट पोलने पुण्यात भाजपा पुन्हा एकदा सत्ता मिळवणार असल्याचा अंदाज वर्तवला आहे. पुणे महापालिकेच्या १६२ जागांसाठी निवडणूक झाली आहे. या निवडणुकीत भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यातच थेट लढत होत आहे. त्यामुळे अजित पवार पुन्हा पुण्याची सत्ता मिळवण्यात यशस्वी होतील का? याकडे सगळ्याचे लक्ष आहे.



दरम्यान, एक्झिट पोलने पुणे महापालिकेची सत्ता कायम राखण्यात भाजपा यशस्वी होण्याचा अंदाज मांडला आहे. प्राबच्या (पॉलिटिकल ब्युरो अँड ॲनालिसिस ब्युरो) एक्झिट पोलनुसार भाजपा सर्वाधिक जागा जिंकेल असा कौल दिला आहे.

# संजय राऊत यांच्या ट्विटने खळबळ

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

एकिकडे महापालिका निवडणुकीची धामधुम सुरू असतानाच दुसरीकडे मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगरानी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लाडके बिल्डर यांच्यात एक बैठक पार पडल्याचे समोर आले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी याबाबत ट्विट केल्यानंतर खळबळ उडाली आहे. "आताची ताजी खबर: मुंबई पालिका आयुक्त भूषण गगरानी यांची व कमळाबाईची प्रदीर्घ चर्चा आणि बैठक संपली. देवेंद्र फडणवीस यांचा मुंबईतील खास खजिनदार ,लाडका बिल्डर आणि गगराणी यांच्या बैठकीत काय शिजले?", असा सवाल संजय राऊत यांनी या ट्विट मधून केला आहे.




मुंबईसह 29 महापालिकांमध्ये आज मतदान पार पडले. या मतदानादरम्यान अनेक मतदान केंद्रांवरील मतदार याद्यांमध्ये गोंधळ असल्याचे समोर आले आहे. तसेच निवडणूक आयोगाने यंदा शाईसाठी वापरलेल्या मार्करची खूण पुसत असल्याचे देखील समोर आले.

# भायखळ्यात EVM मशीन मतदान केंद्रातून थेट टॅक्सीत!

## शिवसेना-मनसे कार्यकर्त्यांनी निवडणूक कर्मचाऱ्यांचा घोळ पकडला

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेची वेळ संपली आहे. यातच एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. मुंबईतील भायखळ्यात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे कार्यकर्त्यांनी निवडणूक कर्मचाऱ्यांचा मोठा घोळ पकडला आहे. येथे मतदान प्रक्रियेची वेळ संपताच मतदान केंद्रातून ईव्हीएम (EVM) थेट टॅक्सीत जमा करण्यात आले. फक्त एक सुरक्षारक्षक असलेली ही टॅक्सी संपूर्ण विभागात मतदान केंद्रातून



ईव्हीएम जमा करत पुढे जात होती. यावरच संशय आल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे कार्यकर्त्यांनी ही टॅक्सी अडवली.

याबतात माहिती देताना मुंबई प्रभाग क्रमांक २०७ च्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेच्या संयुक्त उमेदवार शलाका हरयाण म्हणाल्या की, "मतदान केंद्राच्या बाहेर टॅक्सी उभी केली होती आणि समोरच्या फुटपाथवर उभे होतो. आम्ही येथून निघत होतो, त्यावेळी आम्हाला लक्षात आलं की, ईव्हीएम मशीन मतदान केंद्रातून बाहेर आणून टॅक्सीत ठेवली जात आहे. यानंतर मी येथील निवडणूक अधिकाऱ्यांना विचारणा केली की, ईव्हीएम मशीन आपण कशी काय बाहेर आणल्या. त्यांनी सांगितलं या आरक्षित मशीन आहेत. मी त्यांना सांगितलं की, या जर आरक्षित मशीन आहेत तर, मला नंबर देऊन तुम्ही त्या मशीन माझ्यासमोर सील करा. मला दाखवा आणि पंचनाम्यात लिहून द्या."

शलाका हरयाण म्हणाल्या की, "अधिकाऱ्यांनी आधी टाळाटाळ केली. म्हणाले, आमच्याकडे वेळ नाही. तुमच्याकडे एक तास वेळ घालवायला वेळ नसेल तर, आमची पाच वर्ष आम्ही फुकट घालवायची का? आता निवडणूक अधिकाऱ्यांना कळलं की, त्यांची चूक आहे. आता ते पंचनामा करून देण्यास तयार झाले आहे."

## थोडक्यात...



### किनगाव-अहमदपूर महामार्गावर धावत्या कारला आग

किनगाव (समर्थ गांवकरी) : अहमदपूर महामार्गावर गुरुवारी सकाळी 11.30 वाजण्याच्या सुमारास एक काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली. काजळ हिप्परगा परिसरातील 'डुक्कर बंदा' येथे धावत्या कारने भीषण पेट घेतला. या घटनेत अहमदपूर येथील सहशिक्षक माधव श्रीवाड यांचा गाडीतच होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला. अवघ्या काही दिवसांपूर्वीच अशाच एका कार अपघातातून थोडक्यात बचावलेल्या श्रीवाड यांच्यावर आज त्याच महामार्गावर काळाने घाला घातला. मिळालेल्या माहितीनुसार, सहशिक्षक माधव श्रीवाड हे आपल्या मारुती 800 कारने किनगावकडून अहमदपूरच्या दिशेने येत होते. सकाळी 11.30 वाजण्याच्या सुमारास काजळ हिप्परगा शिवारात त्यांची कार आली असता चालकाचा गाडीवरील ताबा सुटला. यामुळे कार जोरात डिव्हायडरला जाऊन धडकली. धडक इतकी भीषण होती की, काही क्षणातच कारने पेट घेतला. कारने पेट घेताच आगीचा मोठा लोळ उठला. आगीची तीव्रता एवढी प्रचंड होती की श्रीवाड यांना गाडीचा दरवाजा उघडून बाहेर पडण्याची साधी संधीही मिळाली नाही. भरदिवसा महामार्गावर कार आगीच्या गोळ्यात रुपांतरित झाली होती. हे विदारक दृश्य पाहून रस्त्यावरील प्रवाशांनी मदतीसाठी धाव घेतली, मात्र आगीच्या तीव्रतेमुळे कोणालाही जवळ जाता आले नाही.

### केंद्राबाहेर काही काळ गोंधळ

मुंबई (समर्थ गांवकरी) : बृहन्मुंबई महापालिका निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेतील गोंधळाची मालिका सायंकाळपर्यंत सुरुच राहिली. अनेक मतदारांना मतदानाचा हक्क न बजावताच माघारी परतावे लागले. जोगेश्वरी पूर्वेकडील प्रभाग क्रमांक 77 अंतर्गत लालजी टेक्निकल स्कूलच्या मतदान केंद्रावर एका मतदाराला सायंकाळी 5.30 वाजताची वेळ संपल्याचे सांगून चुकीच्या पद्धतीने मतदानाचा हक्क नाकारण्यात आला. वास्तविक तो मतदार सायंकाळी 5.30 वाजण्यापूर्वीच मतदान केंद्रावर पोहोचला होता. मतदान अधिकाऱ्याच्या चुकीच्या कार्यपद्धतीमुळे तो नागरिक मतदानापासून वंचित राहिला. त्यामुळे संतप्त नागरिकांनी मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यानंतरही मतदान करु न दिल्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

### प्रसूतीदरम्यान अर्भकाचा मृत्यू

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी) : अहिल्यानगर शहरात आज (ता. 15) महापालिकेच्या निवडणुकीसाठी मतदानाची धामधूम सुरु असतानाच मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. महापालिकेच्या बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात प्रसूती सुरु असताना अर्भकाच्या डोक्याला कात्री लागल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप माळीवाडा परिसरातील साठे (वैरागळ) कुटुंबीयांनी केला आहे. नगर शहरालगत ओळख गाव परिसरात राहणारे दीपक वैरागळ हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. आज सकाळी त्यांच्या पत्नीला प्रसूतीसाठी बाळासाहेब देशपांडे रुग्णालयात दाखल करण्यात आले. यावेळी उपस्थित परिचारिकांनी 'थोडा वेळ लागेल' असे सांगितल्याने दीपक वैरागळ हे स्वत:ची गाडी आणण्यासाठी घरी गेले.



# गुणदर्शन व सांस्कृतिक स्पर्धेत मिरजगावचे विद्यार्थी चमकले

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर आयोजित विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेमध्ये कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुली मिरजगाव या शाळेतील इयत्ता पाचवी ते आठवीच्या गटामधील विद्यार्थिनींनी महिला सुरक्षा काळाची गरज या नाटिकेचे केंद्र व बीट स्तरावर प्रथम क्रमांक मिळवून नंतर तालुकास्तरावर सादरीकरण करून कर्जत तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

तसेच या नाटिकेची आता जिल्हास्तरावर निवड झालेली आहे..

या नाटिकेचे लेखन दिग्दर्शन व मार्गदर्शन विज्ञान पदवीधर शिक्षिका श्रीमती शबाना तांबोळी यांनी केले आहे.




## मिरजगावच्या पीएम श्री मुली शाळेचे तिहेरी यश

त्याचप्रमाणे याच शाळेतील विद्यार्थिनींनी विविध गुणदर्शन स्पर्धेत सुद्धा यश मिळवले आहे.

इयत्ता सातवीतील विद्यार्थिनी कुमारी समीक्षा पवार हिने महाराणी येसूबाई यांची भूमिका साकारत वेशभूषा स्पर्धेमध्ये कर्जत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

वाचनाची आवड असली की ज्ञान समृद्ध होत जाते आणि आपल्याला आपले विचार मांडण्याची कला अवगत होत जाते. त्यानुसारच अगदी ऐनवेळी दिलेल्या शब्दांपासून अर्थपूर्ण व बोधात्मक गोष्ट तयार करून कुमारी इशिता कोल्हे या इयत्ता सहावीतील विद्यार्थिनीने देखील कर्जत तालुक्यात गोष्ट सादरीकरण या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवला.

तालुकास्तरावर यश संपादन करण्यासाठी शाळेतील शिक्षक कैलास गांगर्डे, विजय हुमे,नवनाथ धोंडे, खेडकर सर, त्र्यंबके सर, शिंदे मॅडम, मोरे मॅडम, बोरुडे मॅडम, तापकीर मॅडम, जगदाळे मॅडम, सुद्रीक सर व शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब डहाळे सर व सर्व शिक्षक वृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच मिरजगाव मुले शाळेतील पदवीधर शिक्षक अकबर शेख सर व मुख्याध्यापक काळे सर यांनीही सहकार्य केले.

विद्यार्थ्यांच्या या चमकदार कामगिरीबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राहूल कोल्हे, उपाध्यक्ष सौ.गौरी कांबळे तसेच सर्व सदस्य, त्याचप्रमाणे मिरजगाव ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व प्रतिष्ठित नागरिक आदींनी अभिनंदन केले आहे. व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# शेअर मार्केटमध्ये जोरदार घसरण !

## पण 'या' ५ शेअर्सने गुंतवणूकदारांना बनवलं मालामाल

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गेल्या काही महिन्यांपासून शेअर मार्केटमध्ये सातत्याने चढ-उतार सुरू आहे. मागील वर्षी शेअर बाजारासाठी फारच निराशा जनक राहिले. गेल्या वर्षी अनेक शेअर्सने निगेटिव्ह रिटर्न दिलेत आणि यामुळे गुंतवणूकदारांचे प्रचंड नुकसान झाले आहे.

गेल्या काही महिन्यांमध्ये प्रचंड नुकसानीचा सामना करावा लागला असल्याने आता गुंतवणूकदार फारच सावध पवित्रा घेताना दिसतायेत. पण एकीकडे मार्केटमध्ये जोरदार घसरण सुरू आहे तर या घसरणीच्या काळात सुद्धा

असे काही शेअर्स आहेत जे आपल्या गुंतवणूकदारांना प्रचंड नफा मिळवून देतायेत. दरम्यान आज आपण अशाच सहा शेअर्स बाबत माहिती पाहणार आहोत ज्यांनी या चढउताराच्या काळात सुद्धा गुंतवणूकदारांना चांगला नफा दिला आहे.

वेदांता : या कंपनीचे शेअर्स मार्केटमध्ये जबरदस्त दबाव असताना सुद्धा चांगली कामगिरी करत आहेत. तीस दिवसात या कंपनीचे शेअर्स २४ टक्क्यांपर्यंत वाढलेत. ही नैसर्गिक संसाधनांची कंपनी आहे.

युनियन बँक ऑफ इंडिया : चढ उताराच्या काळात काही बँकिंग शेअर्स जोरदार आपटलेत. मात्र असे असतानाही युनियन बँक ऑफ इंडिया आपल्या गुंतवणूकदारांना जबरदस्त रिटर्न देत आहे. मागील ३० दिवसांच्या काळात या कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना १८ टक्क्यांपर्यंत रिटर्न मिळाले आहेत.

हिंदुस्तान झिंक : मागील वर्षात चांदीच्या किमतीने एक नवीन रेकॉर्ड सेट केला आहे. आजही चांदीच्या किमती तेजीत आहेत आणि याचाच फायदा हिंदुस्थानी झिंक या कंपनीला होतोय. वेदांता समूहाच्या या कंपनीने मागील ३० दिवसांच्या काळात आपल्या गुंतवणूकदारांना १७% इतके रिटर्न दिले आहेत.

Tata Steel : टाटा समूहाच्या या कंपनीत गेल्या ३० दिवसांच्या काळात दमदार तेजी दिसून आली आहे. मागील एका महिन्यात या कंपनीने आपल्या गुंतवणूकदारांना दहा टक्के एवढे रिटर्न दिले आहेत.

कोल इंडिया : कोळसा उत्पादनाच्या क्षेत्रात सक्रिय असणारी ही सरकारी कंपनी मागील ३० दिवसांच्या काळात गुंतवणूकदारांसाठी फायद्याची ठरली आहे. मागील एका महिन्याच्या कंपनीने आपल्या गुंतवणूकदारांना १३ टक्के एवढे रिटर्न दिले आहेत.

# जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद ८ गट पंचायत समितीचे १६ गण एकूण मतदान ३ ,०७, २२३ : डॉ. स्वप्नील मोरे

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

सार्वत्रिक निवडणूक २०२६ जुन्नर तालुक्यात जिल्हा परिषद एकूण ८ गट व पंचायत समिती एकूण १६ गण आहेत . तालुक्यात ३६६ व एकूण मतदारांची संख्या ३, ०७,२२३ एवढी आहे . अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ . स्वप्नील मोरे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ . सुनील शेळके यांनी माहिती पत्रकार परिषदेमध्ये सांगितली . याप्रसंगी पोलीस निरीक्षक किरण अवचर व कृषी अधिकारी गणेश भोसले उपस्थित होते . सर्व नागरिकांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रक्रियेचे कामकाज पंचायत समिती जुन्नर येथील सभागृहात होणार आहे याची नोंद घ्यावी . नाम निर्देशन पत्र दि . १६ ते २१ सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत स्वीकारणार आहेत . रविवार दि. १८ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नाम निर्देशन पत्र देण्यात येणार नाही . नामनिर्देशन पत्राची छाननी व उमेदवार यादी कामकाज सकाळी ११ वा . सुरू होणार आहे . उमेदवारी मागे घेण्याची दि. २३ , दि. २४ व २७ सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत राहणार आहे . रविवार दि. २५ व दि. २६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने उमेदवारी मागे घेण्याची नोटीस स्वीकारण्यात येणार नाही . निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध व निशाणी वाटप मंगळवार दि . २७ दुपारी ३ : ३० नंतर सुरू होणार आहे . जुन्नर तालुक्यात मतदान दि. ५ फेब्रुवारी सकाळी ७ :३० ते ५ :३० वाजेपर्यंत तसेच मतमोजणी दि. ७ शनिवार सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे . जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रता दि . १० फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल मोरे यांनी सांगितले आहे.




# पर्यावरण पूरक काम करणे गरजेचे

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

'पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक आहे. कारण पर्यावरण प्रदूषण, जलसंकट, वृक्षतोड, आणि हवामान बदल यांसारख्या अनेक समस्यांना सामोरे जात आहे. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपल्याला एकत्रितपणे काम करून निसर्ग संवर्धनाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरण पूरक काम करणे गरजेचे आहे.असे मत डॉ.माणिक बोऱ्हाडे यांनी व्यक्त केले. मंचर येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात पर्यावरण संवर्धन या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.प्राचार्य डॉ.एन. एस.गायकवाड यांनी अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करताना सांगितले कि पर्यावरण संवर्धन वर्तमानकाळातील एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. आपल्या पृथ्वीचे स्वास्थ्य आणि आपले अस्तित्व यांचे रक्षण करण्यासाठी पर्यावरण संवर्धन अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

# भारतातील लोकप्रिय एसयूव्ही आता अधिक गतीशील, अधिक स्मार्ट, अधिक सुरक्षित आणि अधिक आकर्षक आहे कमांड मॅक्ससह ऑल-न्यू टाटा पंच

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

टाटा मोटर्स पॅसेंजर वेईकल्स लि. (टीएमपीव्ही) या भारतातील आघाडीच्या कार्स व एसयूव्ही उत्पादक कंपनीने आज भारतातील सर्वात लोकप्रिय एसयूव्ही नवीन, अधिक गतीशील, अधिक स्मार्ट आणि अधिक आकर्षक लुकमध्ये लाँच करण्याची घोषणा केली.

नवीन टाटा पंचमध्ये तिच्या अद्वितीय सिग्नेचर कमांड मॅक्स अंतर्गत अद्वितीय शक्ती, अधिक आरामदायीपणा, अत्याधुनिक तंत्रज्ञान व शक्तिशाली स्टायलिंगचे संयोजन आहे. नवीन टाटा पंच फक्त 5.59 लाख रूपयांच्या (एक्स-शोरूम, नवी दिल्ली) सुरूवातीच्या किमतीमध्ये उपलब्ध आहे. टाटा पंच ऑक्टोबर 2021 मध्ये पदार्पण करण्यासह सबकॉम्पॅक्ट एसयूव्ही श्रेणीमध्ये आघाडीवर आहे आणि जवळपास 700,000




ग्राहकांनी विश्वास दाखवला आहे. यासह नवीन टाटा पंच आता उद्योग मापदंड निर्माण करण्याचा आपला वारसा प्रगत करत आहे, जेथे दोन नवीन पॉवरट्रेन्समध्ये लाँच करण्यात आली आहे: 1.2 लिटर टर्बोचार्ज्ड आयटर्बो रेव्होट्रॉन इंजिनसह उत्साहवर्धक कार्यक्षमतेचा आनंद घ्या. हे इंजिन अद्वितीय ड्रायव्हिंग उत्साहासाठी दर्जात्मक पॉवर-टू-वेट रेशिओ देते.

अद्वितीय कार्यक्षमता आणि सोयीसुविधेसाठी ट्विन-सिलिंडर आयसीएनजी तंत्रज्ञानासह एएमटी गिअरबॉक्सचे क्रांतिकारी संयोजन असलेल्या पहिल्या एसयूव्हीला ड्राइव्ह करण्याचा आनंद घ्या.

ऑल-न्यू टाटा पंच लाँच करत टाटा मोटर्स पॅसेंजर वेईकल्स लि.चे एमडी व सीईओ श्री. शैलेश चंद्रा म्हणाले, पंचमधून नेहमी भारतीयांच्या सर्वसमावेशक महत्त्वाकांक्षा दिसून आल्या आहेत, तसेच वैशिष्ट्य-संपन्न पॅकेजसह एसयूव्ही अनुभवाचे लोकशाहीकरण केले आहे. ज्यामुळे ही भारतातील सर्वाधिक विक्री होणारी एसयूव्ही ठरली आहे. पंचने भारतीयांना लक्षवेधक स्थिती व आत्मविश्वासासह लांबचा, तणावमुक्त, आंतरशहरीय प्रवासाचा आनंद घेण्याचे स्वातंत्र्य दिले. आज, आम्ही या अनुभवाला नव्या उंचीवर नेले आहे. नवीन पंचसह आम्ही या श्रेणीमधील एसयूव्हीला नवीन आकार दिला आहे, जेथे ग्राहकांच्या अभिप्रायानुसार आधुनिक तंत्रज्ञानासह ही एसयूव्ही डिझाइन करण्यात आली आहे. ही एसयूव्ही अधिक गतीशील, अधिक स्मार्ट आणि अधिक सुरक्षित आहे, ज्याला पूरक आकर्षक, शक्तिशाली पवित्रा आहे, ज्यामधून कमांड मॅक्सचा आत्मविश्वास मिळतो. या उत्क्रांतीमधून ग्राहकांना अधिकाधिक आनंद देण्यासाठी सतत नाविन्यता आणण्याप्रती आमची रुची दिसून येते. आम्हाला भारतातील अनेकांचे मन जिंकण्यासाठी नवीन पंच लाँच करण्याचा आनंद होत आहे. नवीन पंच क्षमता, आकर्षकता आणि अत्याधुनिक नाविन्यतेच्या अद्वितीय संयोजनासह सबकॉम्पॅक्ट एसयूव्ही श्रेणीमध्ये अग्रस्थानी आहे. या एसयूव्हीचा आकर्षक, अपराइट स्टान्स आणि शिल्पाकृती पृष्ठभाग सर्वांचे लक्ष वेधून घेते.

# एचडीएफसी बँक परिवर्तन तर्फे कॅन्सर विषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी मुंबई मॅरेथॉन २०२६ मध्ये उतरवणार सर्वात मोठी कॉर्पोरेट टीम

**मुंबई- : (समर्थ गांवकरी)**

एचडीएफसी बँकेच्या सीएसआर उपक्रम असलेल्या परिवर्तन अंतर्गत मुंबईत दिनांक १८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या टाटा मॅरेथॉन २०२६ मध्ये त्यांचे जवळजवळ १५०० कर्मचारी सहभागी होणार असून या अंतर्गत ते कॅन्सर आणि त्याच्या लवकर निदानाविषयी जागरुकता निर्माण करणार आहेत. यासाठी बँकेने इंडियन कॅन्सर सोसायटी (आयसीएस) या कॅन्सर विषयी काम करणाऱ्या भारतातील सर्वात जुन्या सामाजिक संस्थे बरोबर सहकार्य केले आहे.

एचडीएफसी बँक परिवर्तन अंतर्गत येणाऱ्या त्यांच्या हायजिन पिलर अंतर्गत प्राथमिक आणि प्रतिबंधात्मक आरोग्य उपचार, आरोग्य विषयक पायाभूत सुविधांचा विकास आणि समाजात आरोग्य विषयक कार्यक्रमांना प्रोत्साहन दिले जाते. टाटा मुंबई मॅरेथॉन मधील आयसीएस बरोबरच्या भागीदारी मुळे कॅन्सरचे लवकर निदान केल्याने तो पूर्ण बरा होऊ शकतो या विषयी जागरुकता निर्माण होणार आहे. या सहकार्यामुळे एचडीएफसी बँक परिवर्तनच्या सामाजिक आरोग्या विषयी सर्वसमावेशनाला प्रोत्साहन मिळेल. या मॅरेथॉनचा एक भाग म्हणून आयसीएस तर्फे त्यांचा कॅन्सर पासून मुक्ती मिळालेले रुग्ण आणि आयसीएसचे कर्मचारी असा १०० हून अधिक धावकांचा संघही सहभागी होणार आहे.

या मॅरेथॉन विषयी बोलतांना एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कैझाद भरुचा यांनी सांगितले " आम्ही प्रत्येक परिवाराच्या जीवनाला कोणत्या ना कोणत्या कारणाने स्पर्श करण्यासाठी धावत आहोत. एक बँक म्हणून आमची ही जबाबदारी आहे की वित्तीय सेवांच्या पलिकडे जाऊन आम्ही ज्या समाजाला सेवा देतो त्यांच्या आरोग्याचीही काळजी घेणे. इंडियन कॅन्सर सोसायटी बरोबर उभे राहून जागरुकता, लवकर निदान आणि प्रत्येकाने कॅन्सरचा जीवनावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी उभे राहिल्याचा आंम्हाला आभिमान वाटतो." या भागीदारी विषयी बोलतांना इंडियन कॅन्सर सोसायटी च्या मानद कार्यवाह आणि व्यवस्थापकीय विश्वस्त तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर श्रीमती उषा थोरात यांनी सांगितले " एचडीएफसी बँकेने आंम्हाला केलेले सहकार्य आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचा इतका मोठा संघ कॅन्सर विषयीच्या आमच्या मोहिमेसाठी दिल्या बद्दल त्यांचे आभारी आहोत. कॅन्सर मुळे भारतातील अनेक कुटूंबांवर परिणाम होत असतो आणि जागरुकते मुळे निष्कर्शात सुधारणा होऊ शकते.

ही भागीदारी अधिक सक्षम करण्यासाठी इंडियन कॅन्सर सोसायटी तर्फे एचडीएफसी बँकेच्या कर्मचाऱ्यांसाठी काही निवडक ठिकाणी स्क्रीनिंग कँप्सचे आयोजन करण्यात आले आहे. श्री भरुचा यांनी पुढे सांगितले " एचडीएफसी बँके मध्ये आमचा असा ठाम विश्वास आहे की सक्षम समाज हा आरोग्यपूर्ण जीवनापासून सुरु होतो. आमचे १५०० सहकारी या कार्यासाठी धावणार आहेत याचा मला अभिमान वाटतो. ही संख्या आजपर्यंत मॅरेथॉन मध्ये धावलेली सर्वात मोठी टीम आहे. आमचे कर्मचारी एकत्र येऊन समाजासाठी वचनबध्द होऊन समाजात सकारात्मक बदल घडवत आहेत."

# आकाश पवारांची झेप

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

एमपीएससी राज्यसेवा परीक्षा 2025 मध्ये पुरवठा नियंत्रण अधिकारीपदी निवड होऊन उक्कडगाव (ता. श्रीगोंदा) येथील सुपुत्र व अष्टपैलू क्रीडापटू आकाश पवार यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्याच्या बळावर त्यांनी हे यश मिळवले असून त्यांच्या यशामुळे पुणे जिल्ह्यासह क्रीडा व स्पर्धा परीक्षा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आकाश पवार यांनी उक्कडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत मराठी माध्यमातून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. इयत्ता अकरावी व बारावीचे शिक्षण पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, लोणी प्रवरा नगर येथून पूर्ण केल्यानंतर त्यांनी पुण्यातील नवरोजी वाडिया महाविद्यालयातून बी.एस्सी. (केमिस्ट्री) पदवी प्राप्त केली.

# जेवण न दिल्याने हॉटेल मालकावर गोळीबार

## आरोपीसह दोन जणांना अटक


**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील म्हसणे फाटा येथील चायनिज पॉईट हॉटेलवर जेवण न दिल्याने हॉटेल मालकावर गोळीबार करणाऱ्या आरोपीसह दोन साथीदारांना अटक केल्याची माहिती पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी यांनी दिली. नगर-पुणे महामार्गावरील हॉटेल सुवर्णज्योतमध्ये छापा घालून सुपा पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली. अक्षय उर्फ आकाश संजय वाव्हळ, यश बाळू जाधव (दोघे रा. रांजणगाव मशीद, ता. पारनेर), शुभम ठकसेन वाळके (रा. उखलगाव, ता. श्रीगोंदा) अशी त्यांची नावे आहेत.

हॉटेल मालक संकेत गावडे यांनी सुपा पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, १३ जानेवारी रोजी रात्री १२:३० वाजता म्हसणे फाटा एमआयडीसी येथील चायनिज पॉईंट हॉटेलवर वेटर बाबुराम चौधरी हे आवराआवर करीत होते. त्यावेळी बाहेर कोणीतरी जोरजोरात शटर वाजवत होते. त्यामुळे वेटरने शटर उघडले असता, आरोपींनी 'जेवण पाहिजे, आमची ऑर्डर घ्या' असे म्हणत दमदाटी केली. त्यावर वेटर बाबुराम यांनी हॉटेल बंद झाल्याचे त्यांना सांगितले. हॉटेल मालक संकेत प्रवीण गावडे (वय २५, रा. बाबुर्डी) हे तेथे आले. त्यांनीही आरोपींना हॉटेल बंद झाल्याचे सांगितले. त्याचा राग आल्याने आरोपी अक्षय उर्फ आकाश संजय वाव्हळ याने फिर्यादीस 'तू मला ओळखत नाही का' असे म्हटले. त्यावेळीच त्यांच्या

कारमधून इतर दोन अनोळखी आरोपी खाली उतरले. त्यांनी फिर्यादीला शिवीगाळ करीत मारहाण केली. आरोपी आकाश ताव्हळ याने फिर्यादीच्या कपाळावर पिस्तूल लावून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादी घाबरून तेथून पळून जाऊ लागला असता, आरोपीने मागून त्यांच्यावर गोळीबार केला. त्यात ते थोडक्यात बचावले. याप्रकरणी सुपा पोलिसांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या घटनेतील आरोपी नगर-पुणे रस्त्यावरील हॉटेल सुवर्णज्योत येथे लपल्याची माहिती पोलिस निरीक्षक ज्योती गडकरी यांना खबऱ्याकडून मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी हॉटेलमध्ये छापा घालून तिन्ही आरोपींना जेरबंद केले.

# वडगाव सहानी शिंदे मळा येथे मृत अवस्थेत आढळला बिबट्या



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

निर्मल ग्राम वडगाव सहानी शिंदे मळा येथे सात ते आठ वर्षाचा बिबट्या मृत अवस्थेत आढळला. वडगाव सहानीचे पोलीस पाटील घटनास्थळी पोहोचले आणि वन विभागाला संपर्क करून माहिती कळवली लगेच वन अधिकारी महेश बगाड व सहकारी घटनास्थळी पोहोचून बिबट्याची पाहणी केली असता त्यांनी सांगितले की दोन बिबट्यांच्या हाणामारी मध्ये हा बिबट्या मृत्युमुखी पडला आहे.परंतु स्थानिक नागरिकां नी सांगितले की अजून देखील या ठिकाणी बिबट्या आहेत त्यामुळे आपण तात्काळ या ठिकाणी पिंजरा लावून बिबट्यांचा बंदोबस्त करावा.याप्रसंगी किरण शिंदे, वैभव शिंदे,रघुनाथ तांबोळी, बाळासाहेब शिंदे,बाबुराव शिंदे आणि सत्यवान दरेकर वडगाव सहानीचे पोलीस पाटील गणेश जेडगुले उपस्थित होते.

# शासकीय चित्रकला परीक्षेचा शंभर टक्के निकाल

## चैतन्याची शर्वरी आरोटे राज्यात ८१ वी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालय ओतूरचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विद्यालयाची विद्यार्थिनी शर्वरी राजेंद्र आरोटे ही राज्य गुणवत्ता यादीत ८१ वी आली. या दोन्ही परीक्षेस विद्यालयातील १४७ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी अ श्रेणी २८ विद्यार्थ्यांना , ब श्रेणी ५१ विद्यार्थ्यांना व क श्रेणी ६८ विद्यार्थ्यांना प्राप्त झाली. अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली . शासकीय चित्रकला परीक्षा महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ आणि कला संचलनालय महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत घेतली जाते.चैतन्य विद्यालय ओतूर मध्ये शासकीय चित्रकला परीक्षेचे केंद्र आहे . या परीक्षेला परिसरातील वीस माध्यमिक शाळांचे ६४३ विद्यार्थी बसले होते.विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे आणि त्यांना कलाक्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी पात्र ठरविणे हा या परीक्षेचा उद्देश आहे. विद्यालयात दरवर्षी अनेक विद्यार्थी या परीक्षेत बसतात. त्यांच्या या यशामागचे कारण सातत्यपूर्ण सराव,मेहनत व एकाग्रता आहे.या परीक्षेस अ , ब व क श्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे दहावीच्या परीक्षेत सात , पाच व तीन असे




वाढीव गुण मिळतात. अशी माहिती कलाविभाग प्रमुख संतोष सोनवणे यांनी दिली . शर्वरी राजेंद्र आरोटे( राज्य गुणवत्ता यादीत ८१वी ) , आदित्य संतोष फापाळे,अंजली योगेश खेत्री,अथर्व विठ्ठल कुटे, गार्गी राजेंद्र आरोटे,नंदिनी दीपक पाचपुते ,नियती मनोज पटेल , पलक रामदास डोंगरे ,श्रुती बाळू नलावडे ,वरद चंद्रशेखर नलावडे .आराध्य प्रभाकर दिघे,आराध्या मंगेश डुंबरे ,आर्या जीवन गाढवे , तन्वी प्रशांत डुंबरे,तेजल कैलास देवकर,यश्मी योगेश हांडे, सुप्रभा बाळासाहेब साबळे, स्वराज तुकाराम गायकर,शुभदा सुहास बनकर,सोनाली जितेंद्र इसकांडे,सृष्टी महादेव तौर, समृद्धी उमेश डुंबरे , रसिका प्रमोद लांडगे , ज्ञानेश्वरी विजय मांडे,कार्तिक संजय गायकर, आर्या विक्रांत बनकर,भार्गव संतोष लोहके ,दिव्या दत्तात्रय हाडवळे . या यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे कलाशिक्षक संतोष सोनवणे व बाळासाहेब साबळे यांनी मार्गदर्शन केले सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघूनाथ तांबे,प्रदीप गाढवे,पंकज घोलप,रोहीदास घुले,मुख्याध्यापिका राजश्री भालेकर,संजय हिरे,अनिल उकिरडे,अजित डांगे यांनी अभिनंदन केले.

# बनावट मतदार ओळखपत्रांचा पर्दाफाश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर येथील महानगरपालिका निवडणुकीसाठी आज मतदान प्रक्रिया पार पडत असताना एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. शहरातील सावेडी भागातील आनंद विद्यालय मतदान केंद्रावर बनावट मतदार ओळखपत्रांच्या आधारे मतदान करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन तरुणांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. या घटनेमुळे निवडणूक वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. प्रभाग क्रमांक ३ मधील आनंद विद्यालय येथील केंद्रावर दोन संशयित व्यक्ती मतदानासाठी आल्या होत्या. त्यांच्याकडील ओळखपत्रांबाबत निवडणूक कर्मचाऱ्यांना संशय आल्याने त्यांनी कसून चौकशी केली. यावेळी संबंधित व्यक्तींकडे असलेली मतदार ओळखपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले. निवडणूक कर्मचाऱ्यांनी तत्काळ पोलिसांना पाचारण करून या दोघांनाही रंगेहाथ पकडून दिले.



ताब्यात घेतलेल्या संशयितांची झडती घेतली असता, त्यांच्याकडे वेगवेगळ्या नावांची अनेक बनावट मतदार ओळखपत्रे सापडली. ही ओळखपत्रे इतक्या हुबेहूब पद्धतीने तयार करण्यात आली आहेत की, प्रथमदर्शनी ती बनावट असल्याचे ओळखणे कठीण जात होते. तंत्रज्ञानाचा वापर करून मतदानात गैरप्रकार करण्याच्या उद्देशानेच ही ओळखपत्रे तयार करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत आहे.

सदर प्रकार उघडकीस येताच मतदान केंद्रावर उपस्थित असलेले विविध राजकीय पक्षांचे उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी आक्रमक पवित्रा घेतला. लोकशाही प्रक्रियेत अशा प्रकारे घुसखोरी करणे हा गंभीर गुन्हा असून, या प्रकरणामागील मुख्य सूत्रधार कोण आहेत, याचा शोध घेण्याची मागणी उमेदवारांनी केली. या प्रकारामुळे केंद्र परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता, मात्र पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली.

पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींची सखोल चौकशी सुरू असून या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास केला जात आहे.

दरम्यान, शहरात मतदानाचा उत्साह पाहायला मिळत असून दुपारी १.३० वाजेपर्यंतची आकडेवारी प्रशासनाने जाहीर केली आहे. सकाळी ७.३० ते दुपारी १.३० या वेळेत एकूण १,०४,११० मतदारांनी आपला हक्क बजावला असून मतदानाची टक्केवारी ३३.९१ नोंदवण्यात आली आहे.

**मतदानाची आकडेवारी खालीलप्रमाणे**

पुरुष मतदार: ५५,९६२
महिला मतदार: ४८,१४५
इतर: ३
एकूण मतदान: १,०४,११०
टक्केवारी: ३३.९१%

# डॉ. पाऊलबुधे तंत्रनिकेतनचे हिवाळी परीक्षेत सुयश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नारायणडोह येथील डॉ. ना.ज.पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजच्या हिवाळी 2025 परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले असून उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाराष्ट्र राज्य तांत्रिक शिक्षण मंडळ तर्फे हिवाळी सत्र परीक्षा डिसेंबर 2025 मध्ये घेण्यात आल्या होत्या. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या नारायणडोह येथील डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजचे विद्यार्थ्यांनी चांगले सुयश मिळवले असून उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

स्थापत्य विद्युत यंत्र अभियांत्रिकी विभागातील प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे,प्राचार्य,राजेद्र देशपांडे अभियांत्रिकी विभाग प्रमुख जाबीर अली, विद्युत विभाग प्रमुख प्रणिता करांडे,स्थापत्य विभाग प्रमुख जयश्री होले, संगणक विभाग प्रमुख प्रियंका अंबाडे,प्रथम वर्ष विभाग प्रमुख स्वाती गुंदेचा, प्राध्यापक, शिक्षिकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

प्रथम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी मधून साद सय्यद 87.06% गुण मिळवून प्रथम, विद्युत विभागात वैष्णवी काळे 79.65% यंत्र अभियांत्रिकेतील अंकुर मेहेर 71.43% तर जागृती गावखरे 86.14% गुण मिळवून विभागात पहिले आले.

द्वितीय वर्षातील स्थापत्य विभागात गायत्री वर्मा विद्युत विभागात कुणाल देवकर यंत्र विभागात संग्राम सावंत तर कृत्रिम बुद्धिमत्ता मध्ये प्रतीक नागपुरे हे प्रथम आले आहेत. तर अंतिम वर्ष स्थापत्य विभागात विश्वजीत पवार 85.44% विद्युत विभागात प्रज्योत घोंगडे 78.44% यंत्र अभियांत्रिकेतील रेहान शेख 82.71% गुण मिळवून पहिले आले आहेत. कॉम्प्युटर विभागातील तृतीय वर्षात दिव्या अंकाराम 91.29% गुण मिळून प्रथम तर नीलम सय्यद 90.83% द्वितीय कृष्णा रंगाटे 90.24% तृतीय क्रमांकाने कॉलेजमध्ये यश मिळवले. द्वितीय वर्षातील कॉम्प्युटर विभागात वैष्णवी जगताप 86.35% प्रथम,श्रुती घोरपडे 84.82% द्वितीय तर अमजद शेख 80.35% गुण मिळवून कॉलेजमध्ये तृतीय आला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना कॉलेजचे प्राचार्य, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

# टायटनच्या Edge ब्रँडकडून 'Fumage' चे अनावरण

- ३ वर्षांनंतर सादर झाले नवीन सिरेमिक केस – धुराच्या कवितेला Edge च्या अचूक कारागिरीची जोड

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

टायटनच्या प्रीमियम घड्याळ ब्रँड Edge by Titan ने 'Fumage' या नव्या कलेक्शनचे अनावरण केले आहे. नवीन भूमिती, पुनर्रचित सिरेमिक ब्रेसलेट आणि फ्युमे (fumé) डायलसह सादर झालेले हे घड्याळ Edge पोर्टफोलिओमधील तीन वर्षांनंतरचे पहिले नवीन सिरेमिक केस आहे. हे लाँच ब्रँडसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरून, अधिक स्लीक प्रोफाइल, टिकाऊ केस आर्किटेक्चर आणि हाताने तयार केलेल्या ग्रेडियंट डायलसह साहित्याच्या दिशेतील बदल अधोरेखित करते. धुराच्या



तरल हालचालींनी प्रेरित झालेली Fumage ची रचना नियंत्रित अराजक (Controlled Chaos) ही संकल्पना मांडते—जिथे हालचाल आहे, पण ती अचूकतेत बांधलेली आहे. Edge ची ओळख असलेली पातळ, मिनिमल आणि आधुनिक शैली जपतानाच, या नव्या कलेक्शनमध्ये अधिक धारदार दृष्टीकोन आणि जिवंतपणा दिसून येतो. नवीन केस आर्किटेक्चर आणि इंटिग्रेटेड सिरेमिक ब्रेसलेटमुळे घड्याळाचा ग्लॉसी सिलुएट अधिक ठसठशीत झाला आहे. सॅटिन फिनिश बेझल, पॉलिश्ड बेव्हल्स आणि सिरेमिक लिंक्समुळे प्रकाशाचा नियंत्रित खेळ दिसून येतो. ही रचना दैनंदिन वापरासाठी टिकाऊ असतानाच मनगटावर उठून दिसणारी आहे. फ्युमे डायल मल्टी-स्टेज लॅकरिंग प्रक्रियेद्वारे तयार करण्यात आला असून, कडेला गडद आणि मध्यभागी उजळ असा ग्रेडियंट इफेक्ट धुराच्या हालचालींचे कलात्मक रूपांतर करतो. डिझाइन केंद्रस्थानी असलेल्या या काळात Fumage चे आगमन झाले आहे. नवीन सिरेमिक केस ही केवळ सुधारणा नसून, Edge कडून अधिक धाडसी डिझाइन निर्णयांची स्पष्ट खूण आहे. नवीन साहित्य, फ्युमे-प्रेरित डायल आणि Edge ची सिग्नेचर स्लिमनेस यांचा संगम ब्रँडचा आत्मविश्वास अधोरेखित करतो.

# डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीत लाभणार कलाकारांची उपस्थिती

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे गावाच्या सर्वांगिण विकासासाठी आणि प्रगतीसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला महाराष्ट्राचे लाडके कलाकार, 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप व अभिनेत्री शिवाली परब हे १८ जानेवारी २०२५ रोजी ठीक सकाळी ९ वाजता ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे उपस्थित राहून आपल्याशी संवाद साधणार आहे.

# एसीएमए ऑटोमेकॅनिका न्यू दिल्ली 2026 प्रदर्शनाचे आयोजन

**19 देशांमधील 800 हून अधिक प्रदर्शक उपस्थित राहणार**

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतातील ऑटोमोटिव्ह सेवा व विक्रीपश्चात्त उद्योगासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा एसीएमए ऑटोमेकॅनिका न्यू दिल्ली 2026 हा मेळावा यशोभूमी (आयआयसीसी), द्वारका येथे 5 ते 7 फेब्रुवारी 2026 पर्यंत आयोजित करण्यात येणार आहे, जेथे 19 देशांमधील 800 हून अधिक प्रदर्शक उपस्थित असण्याची अपेक्षा आहे.

50,000 चौरस मीटरहून अधिक जागेवर आयोजित करण्यात येणाऱ्या या प्रदर्शनामध्ये 3,000 हून अधिक ब्रँड्स, तसेच 285 फर्स्ट-टाइम प्रदर्शक एकत्र येतील. या प्रदर्शनामध्ये संपूर्ण आफ्टरमार्केट स्पेक्ट्रम, तसेच ऑटोमोटिव्ह कम्पोनण्ट्स,



इलेक्ट्रॉनिक्स व सिस्टम्स, दुरूस्ती व देखभाल, डायग्नोस्टिक्स, बॉडी व पेंट, अ‍ॅक्सेसरीज व कार केअर यांसोबत उदयोन्मुख गतीशीलता व सर्विस तंत्रज्ञानांना दाखवण्यात येईल. आंतरराष्ट्रीय सहभागामध्ये चीन, जर्मनी, इराण, हाँगकाँग, श्रीलंका व तैवानमधील प्रदर्शक आणि कंट्री पॅव्हिलियन्सचा समावेश आहे, ज्यामधून सोर्सिंग हब व आफ्टरमार्केट (विक्री पश्चात सोल्यूशन्स) उत्पादनांसाठी उपभोग बाजारपेठ म्हणून भारताप्रती वाढती रूची दिसून येते. आंतरराष्ट्रीय प्रदर्शक आहेत जीएमबी, ऑटो ट्यूनर (एफआर टीम इंटरनॅशनल), हॉर्स पॉवरट्रेन सोल्यूशन्स, टेक्नोरोट ऑटोमोटिव्ह, सिनबार ऑटोमोटिव्ह, होरपोल आणि नगानो इंडस्ट्रीयल अँड कमर्शियल एनकरेजमेंट ऑर्गनायझेशन. समर्पित वर्कशॉप पॅव्हिलियन डायग्नोस्टिक्स, सर्विस इक्विपमेंट आणि नेक्स्ट-जनरेशन आफ्टरमार्केट तंत्रज्ञानांवर लक्ष केंद्रित करेल.

या प्रदर्शनामध्ये सहभाग घेणारे भारतातील आघाडीचे उत्पादक आहेत अ‍ॅम्पल ऑटो टेक, बॅन्को प्रॉडक्ट्स (इंडिया), इलोफिक इंडस्ट्रीज, जेके फेनर इंडिया, मॅन+ह्युमेल फिल्टर, मींडा कॉर्पोरेशन (स्पार्क मींडा) एनआरबी बीअरिंग्ज, शेफलर इंडिया, एसकेएफ इंडिया, विन्नी केमिकल्स आणि झेडएफ इंडिया.

एसीएमएसाठी हा इव्हेण्ट उत्पादनांचे प्रदर्शन करण्यासोबत भारताला दर्जा-संचालित, तंत्रज्ञान-केंद्रित आफ्टरमार्केट सोल्यूशन्ससाठी विश्वसनीय सहयोगी म्हणून सादर करतो, असे ऑटोमोटिव्ह कम्पोनण्ट मॅन्युफॅक्चुरर्स असोसिएशन (एसीएमए)चे डायरेक्टर जनरल श्री. विनी मेहता म्हणाले.

# वसुंधरा अकॅडमीत भारतीय लष्कर दिना निमित्त जवानांचा सन्मान

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

देशाचे रक्षण करणाऱ्या आपल्या शूर सैनिकांच्या शौर्य, समर्पण आणि बलिदानाचा गौरव करण्यासाठी वसुंधरा अकॅडमी, अकोले येथे भारतीय लष्कर दिन मोठ्या गर्वाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. १५ जानेवारी १९४९ रोजी जनरल के. एम. करिअप्पा यांनी ब्रिटीश जनरल सर फ्रान्सिस बुचर यांच्याकडून भारतीय लष्कराची धुरा आपल्या हाती घेतली आणि ते भारतीय लष्कराचे पहिले 'कमांडर-इन-चीफ' झाले. हा ऐतिहासिक दिवस आपण दरवर्षी 'भारतीय लष्कर दिन' म्हणून साजरा करतो. हा ऐतिहासिक दिवस विद्यार्थ्यांसमोर सादर करण्यासाठी वसुंधरा अकॅडमीने आर्मी सेवेमध्ये कार्यरत असलेल्या पालकांना निमंत्रित केले. सफायर द ब्ल्यू हाऊसच्या विद्यार्थ्यांनी भारतीय लष्कर दिन या थीमवर परिपाठ सादर केला. सफायर द ब्लू हाऊसच्या हाऊस



मास्टर कल्पना मांडलिक यांनी सर्व अतिथींचे स्वागत केले. पुष्पा हसे मॅडम सर्व सैनिकांच्या प्रती आदर, सन्मान व कृतज्ञता व्यक्त केली. वसुंधरा अकॅडेमीच्या गीतमंचाने संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ सरांच्या मार्गदर्शनाखाली देशभक्तीपर गीत सादर केले. काही विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर स्फूर्तीदायी नृत्य सादर केले. ओवी सतपुते या इयत्ता तिसरीच्या विद्यार्थिनीने भारतीय सैन्यप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करणारे हृदयस्पर्शी मनोगत व्यक्त केले. वसुंधरा अकॅडेमीचे पालक व आर्मी सेवेमध्ये कार्यरत असलेले दशरथ दिवटे, अनिल चौधरी व त्यांच्या पत्नी कुंदा चौधरी, अविनाश हांडे, रामदास भांगरे आणि सचिन नवाळे यांचा संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा कॅम्पस डायरेक्टर प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख व उपप्राचार्य राधिका नवले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. श्री. सचिन नवाळे यांनी आपल्या मौल्यवान शब्दांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रभक्तीची प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले. सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रती आदरभाव व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी या सैनिकांना आदराचा व कृतज्ञतेचा सॅल्यूट केला. एकंदरीत, संपूर्ण वातावरण खऱ्या अर्थाने देशभक्ती, आदर आणि राष्ट्रीय गर्वाने भरून गेले. विद्यार्थ्यांच्या समोर देश प्रेमाचे, राष्ट्रभक्तीचे एक रोल मॉडेल सादर झाले. ज्यांच्या जीवावर आपण सर्वजण सुखाचा घास व शांततेची झोप घेऊ शकतो त्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांप्रती आदर भाव व कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाली.

# कीर्तनातून जीवनमूल्यांचा संदेश

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील हिरडगाव येथील महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य श्री. दिलीप भुजबळ यांच्या मातोश्री कै. जाईबाई दगडू भुजबळ यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन श्रद्धाभावाने करण्यात आले होते. यावेळी दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करून भुजबळ कुटुंबीयांप्रती उपस्थितांनी मनःपूर्वक संवेदना व्यक्त केल्या. या प्रसंगी ह.भ.प. ज्ञानेश्वरजी महाराज तांबे (नेवासेकर) यांच्या सुश्राव्य कीर्तन सेवेचा लाभ उपस्थितांना झाला. त्यांच्या कीर्तनातून जीवनमूल्ये, श्रद्धा, संयम व आत्मिक बळ यांचे महत्त्व प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले. कीर्तनाने उपस्थितांच्या मनात सकारात्मक ऊर्जा व वैचारिक प्रबोधन निर्माण केले.

# आनंद मेळाव्यातून स्वयंरोजगाराचे धडे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथील श्री शिव छत्रपती महाविद्यालयामध्ये वार्षिक स्नेह संमेलनानिमित्त विद्यार्थ्यांच्याव्यवसायिक कौशल्यांना चालना देण्यासाठी दि.15/01/2026 रोजी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष व्यवसायिक दृष्टीकोन वृध्दींगत होऊन भविष्यात यशस्वी उद्योजक बनन्याची संधी यानिमित्ताने प्राप्त होईल.या उपक्रमा मध्ये विविध खादयपदार्थ,हस्त कौशल्यावर आधारित तयार केलेल्या वस्तू या सारखे असंख्य स्टॉल उभारण्यात आले होते.स्टॉलचे नियोजन,भांडवल व्यवस्थापन,विक्री कौशल्य या बाबी विदयार्थ्यांना अनुभवता आल्या.



या कार्यक्रमाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम बी.वाघमारे यांच्या हस्ते करण्यातआले.यावेळी बोलताना त्यांनी अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण,आत्मविश्वास व व्यवसायिक व उद्योजकीय दृष्टीकोनाचा विकास होतो असे मत व्यक्त केले.अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी कुलकर्णी यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा देताना आनंद मेळाव्यातून विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचे कौशल्य अवगत होईल व त्यांना निश्चितपणे उपयोग होईल अशा शुभेच्छा दिल्या. संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड संजय शिवाजीराव काळे यांनी या कार्यक्रमासाठी शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष प्रतिनिधी प्रा.व्ही.बी. कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम. बी.वाघमारे,स्नेहसंमेलन प्रमुख प्रा.डी.बी.सोनार,उपप्राचार्य डॉ.आर.डी.चौधरी,पर्यवेक्षक प्रा. एस.ए.श्रीमंते,एमसीव्हीसी प्रमुख प्रा. के.जी.नेटके, कार्यालयीन प्रबंधक सौ.एम.डी. कोरे,विविध शाखांचे प्रमुख तसेच आनंद मेळाव्याचे वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख डॉ ई.डी. वाजगे,आनंद मेळाव्याचे कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन सौ व्ही.एम.बनकर,विभागतील सदस्य तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेश डोंगरे यांच्या निवडीवरून पवारांचा जोरदार हल्लाबोल

**जामखेड: (समर्थ गांवकरी)**

जामखेड नगरपरिषदेतील स्वीकृत नगरसेवकपदी गणेश डोंगरे यांच्या निवडीवरून आमदार रोहित पवार यांनी सभापती प्रा. राम शिंदे यांच्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून जोरदार निशाणा साधला आहे. या निवडीवर तीव्र शब्दांत प्रतिक्रिया देत त्यांनी अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.आमदार रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, " संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा मास्टरमाइंड असलेल्या वाल्मिक कराडच्या विश्वासू व्यक्तीला स्वीकृत नगरसेवक करून सभापती राम शिंदे यांचा बदलापूरच्या तुषार आपटे प्रकरणाची पुनरावृत्ती करण्याचा मानस आहे का?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.पुढे ते म्हणाले, "गुन्हेगार व गुन्हेगारांशी संबंधित व्यक्तींनाच स्वीकृत नगरसेवक करण्याचा भाजपने चंग बांधला आहे का? चांगली, स्वच्छ प्रतिमेची लोकं त्यांना सापडत नाहीत का? सर्वसामान्यांच्या वेदनांचाही बाजार मांडला जातो का?" अशा शब्दांत त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या वक्तव्यामुळे जामखेडच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून, स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीवरून राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसत आहेत. आता या आरोपांवर सभापती प्रा. राम शिंदे काय प्रतिक्रिया देतात,याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नगरसेवकपदी गणेश डोंगरे यांची मंगळवारी निवड झाली. आमदार सुरेश धस यांचे ते समर्थक आहेत. धस यांच्यामार्फत निवडणुकीत डोंगरे यांनी मोठ्या राजकीय खेळी केल्या होत्या. त्यामुळे भाजपसाठी निवडणूक सोपी झाली.

# मवेशी येथे पोलीस भरती प्रशिक्षणार्थींना प्रेरणादायी दिशा

**सखाराम तळपाडे यांचा संवाद!**

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

मवेशी येथील पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र आज केवळ प्रशिक्षणाचे ठिकाण न राहता, स्वप्नांना दिशा देणारे आणि आत्मविश्वासाला नवे बळ देणारे प्रेरणास्थान बनले होते.

उपक्रमशील ग्रामपंचायत अधिकारी श्री. सखाराम तळपाडे (भाऊसाहेब) यांनी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांशी सुमारे ४० मिनिटे मनमोकळा संवाद साधत त्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली.

या वेळी PRTC चे बांगर सर तसेच पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांची उपस्थिती कार्यक्रमाला अधिक अर्थपूर्ण ठरली.

भाऊसाहेबांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, "यश एका दिवसात मिळत नाही. ते रोजच्या संघर्षातून, घामातून, अपयशातून आणि पुन्हा उभे राहण्याच्या जिद्दीतून घडते."

सातत्यपूर्ण अभ्यास, कठोर परिश्रम आणि आत्मशिस्त याशिवाय यशाचा कोणताही शॉर्टकट नाही, हे त्यांनी ठामपणे पटवून दिले. "व्यसन क्षणिक आनंद देईल, पण स्वप्नांची हत्या करेल," या शब्दांनी अनेक विद्यार्थी अंतर्मुख झाले.

ध्येय नेहमी उंच ठेवा आणि त्या ध्येयासाठी दररोज स्वतःशी प्रामाणिक रहा, हा संदेश उपस्थितांच्या मनात ठसठशीतपणे उमटला.



आई-वडील आणि शिक्षक हेच आपल्या आयुष्याचे खरे शिल्पकार असल्याचे सांगत, त्यांना आदर्श मानून चाललेली वाटचाल कधीही भरकटत नाही, असा विश्वासाचा दीप त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात पेटवला.

या भावनिक संवादाला कृतीची जोड देत भाऊसाहेबांनी विद्यार्थ्यांना पोलीस भरतीसाठी उपयुक्त असा समग्र ठोकळा भेट दिला.

तसेच राहुल राऊत यांनी विश्वास नागरे पाटील लिखित "मन में है विश्वास" हे प्रेरणादायी पुस्तक भेट देत, "ज्ञान हीच खरी ताकद आहे आणि विश्वास हेच यशाचे मूळ आहे," असा संदेश दिला.

या प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत स्वप्नांची चमक दिसत होती, तर अनेकांच्या मनात "आता मागे वळायचं नाही" असा ठाम निर्धार निर्माण झाला. उत्स्फूर्त प्रतिसादातून नवी उमेद, नवा आत्मविश्वास आणि नव्या लढ्याची सुरुवात झाल्याची जाणीव सर्वांनाच झाली. यानंतर मवेशी येथे अड. मनोहरराव नानासाहेब देशमुख महाविद्यालय, राजूर यांच्या NSS विशेष संस्कार शिबिराअंतर्गत ३५ मिनिटांचे प्रेरणादायी व्याख्यान पार पडले.

सेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व विशद करत "स्वतःसोबत समाजासाठी जगण्याची प्रेरणा" विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्यात आली. या संपूर्ण उपक्रमाला NSS कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. टी. शेणकर व प्रा. बी. एच. तेलोरे यांच्या मार्गदर्शनाची मोलाची साथ लाभली. भावना, प्रेरणा आणि सकारात्मक ऊर्जेच्या वातावरणात हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

# आदित्य बुऱ्हाडेची चमकदार कामगिरी

## चौथा क्रमांक पटकावत ब्रॉंझ पदक पटकाविले ; अभिनंदनाचा वर्षाव

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत मिरजगाव येथील रहिवासी आदित्य प्रभाकर बुऱ्हाडे याने नेत्रदीप असे यश संपादन करून ब्रॉंझ पदक पटकाविले आहे.

पुणे जिल्ह्यातील मुळशी येथे सन.२०२५/२६ मधील नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत मिरजगाव येथील रहिवासी व कडा येथील स्केटिंग क्लासचा विद्यार्थी आदित्य प्रभाकर बुऱ्हाडे यानी वयोगट १४ मुलांमध्ये धमाकेदार कामगिरी करत चौथा क्रमांक पटकाविला असून त्याने ब्रॉंझ पदकाची कमाई केली आहे.

मुळशी येथे घेण्यात आलेली ही स्पर्धा भारतातील सर्वोत्कृष्ट स्केटर्स साठी आयोजित केलेली एक वार्षिक स्पर्धा असुन या स्पर्धेत विविध राज्यांतून असंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या कामगिरीवर त्याची गोवा येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी निवड झालेली आहे.

आंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी टीम टॉपरचा आदित्य हा कडा स्केटिंग क्लासचा पहिला विद्यार्थी ठरला आहे. त्याला अहेमद पठाण सर यांनी प्रशिक्षण दिले आहे.

आदित्य हा मिरजगाव येथील





नामांकित ज्वेलर्स व्यापारी पांडुरंग बुऱ्हाडे यांचा पुतण्या व कडा येथील महावीर न्यु इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी आहे.

त्याच्या यशामुळे मिरजगावच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

कु.बुऱ्हाडे याला पुढील स्पर्धेसाठी टीम टॉपरचे अध्यक्ष प्रशांत पाटोळे सर, जमीर सय्यद, दाऊद शेख, अजीम शेख, महेश राऊत, आकाश गाडेकर, प्रमोद यादव सर व प्रशिक्षक अहेमद पठाण सर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

तसेच या यशाबद्दल मिरजगाव व कडा परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्याचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.



हिंदुस्थानातील थोर समाजसेवक जेष्ठ समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी पंढरपूर येथे सदिच्छा भेट दिली यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष नागेश आदापुरे यांनी शाल पुष्पगुच्छ श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला......

## थोडक्यात बातम्या...




### आर. के. पालवी शाळेतील कु. रुद्र मोरे एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत चौथा

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील आर.के.पालवी इंग्रजी शाळेतील इयत्ता आठवी मध्ये शिकणारा कु. रुद्र वसंत मोरे या विद्यार्थ्याने एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रातून चौथा क्रमांक मिळवला असून आपल्या शाळेचे व परिसराचे नाव उज्वल केले आहे. सदर एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षेसाठी कला शिक्षिका नम्रता शेलार , शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पालवी यांचे मार्गदर्शन लाभले असून, त्याच्या यशामुळे आपल्या पडघा गावाचे नाव राज्यात उंचावले आहे. तर आर.के.पालवी इंग्रजी शाळेतील शिक्षकांकडून व शाळेकडून अभिनंदन होत असून , विविध स्तरावर कु. रुद्र वसंत मोरे या विद्यार्थ्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### सह्याद्री विद्यालयाचा कृष्णा आरोटे याची विज्ञान प्रदर्शनात चमक

ब्राम्हणवाडा (स. गांवकरी) : अकोले तालुक्यातील सह्याद्री विद्यालय ब्राम्हणवाडा येथील इयत्ता ८ वीचा विद्यार्थी कृष्णा प्रवीण आरोटे याने जामखेड येथे झालेल्या विज्ञान प्रदर्शनात आपल्या कल्पकतेने आणि संशोधनक्षमतेने प्रथम क्रमांक पटकावला आहे. कृष्णाच्या या उल्लेखनीय यशामुळे शाळा, गाव व अकोले तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याच्या प्रकल्पाची दखल घेत नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी त्याची निवड करण्यात आली आहे. या यशाबद्दल कृष्णा आरोटे याचे सर्वत्र अभिनंदन होत असून शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थांनी त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. सह्याद्री विद्यालयाच्या गुणवत्तेची ही आणखी एक ठळक कामगिरी ठरली आहे.



### महानगरपालिकेच्या शाळेत मतदान

ठाणे (स. गांवकरी) : दिव्यातील प्रभाग क्र २७ मधील शिवसनेचे चारही उमेदवार शैलेश मनोहर पाटील, स्नेहा अमर पाटील, दीपाली उमेश भगत व अँड. आदेश कमलाकर भगत यांनी दिवा पश्चिम येथील ठाणे महानगरपालिकेच्या शाळेत आपला मतदानाचा हक्क बजावला.

### मकरसंक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर कुंटूरकर शुगर्सकडून शेतकऱ्यांना दिलासा

नायगाव (स. गांवकरी) : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वासाला अधिक बळ देत कुंटूरकर शुगर अँड ॲग्रो प्रा. लि., मोहननगर कुंटूर (ता. नायगाव) यांनी मकरसंक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर ऊस बिलाचा पहिला हप्ता प्रति टन २७०० रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला. या निर्णयामुळे परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. कारखान्याचा २०२५–२६ चा ११ वा गाळप हंगाम काहीसा उशिरा सुरू झाला, मात्र अवघ्या ४५ दिवसांत १ लाख ६० हजार मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले आहे. गाळप हंगामाच्या सुरुवातीलाच ऊस बिलाचा पहिला हप्ता अदा केल्याने कुंटूरकर परिवारावर शेतकऱ्यांचा असलेला विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन राजेश गंगाधरराव देशमुख कुंटूरकर म्हणाले की, “साखर कारखाना चालवणे सोपे नाही. विविध ठिकाणांहून कर्मचारी एकत्र करून एकविचाराने काम करावे लागते. अनेक आमिषे दाखवली जातात, मात्र या भागातील शेतकरी आमच्यावर विश्वास ठेवतात. आम्ही कुठल्याही कारखान्याशी स्पर्धा न करता नेहमी शेतकऱ्यांच्या कष्टांचा विचार करतो.”

## अकोले, कोपरगाव, संगमनेर येथील रुग्णालयांचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन

- राज्य शासनाची मान्यता
- जिल्ह्यातील आरोग्य सुविधांच्या बळकटीकरणावर भर
- पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

जिल्ह्यातील अकोले, कोपरगाव आणि संगमनेर या तीनही तालुक्यांच्या ठिकाणी असलेल्या ३० खाटांच्या (बेड) ग्रामीण रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करून त्यांचे १०० खाटांच्या रुग्णालयांमध्ये रूपांतर करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. आरोग्य मंत्री आणि शासनाकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची माहिती राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण



विखे पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी शासन स्तरावर विशेष प्रयत्न सुरू आहेत. याविषयी माहिती देताना पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, तिन्ही तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयांचे १०० खाटांमध्ये रूपांतर व्हावे, अशी लोकप्रतिनिधी व नागरिकांची मागणी होती. या अनुषंगाने आरोग्य मंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीनंतर श्रेणीवर्धनास मान्यता मिळाली असून, यामुळे उपचाराचा मार्ग सुकर झाला आहे. तसेच जिल्हा वार्षिक योजनेतून सर्व उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांना औषधे व साधनसामग्रीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

जिल्हा शासकीय रुग्णालयात (अहिल्यानगर) सुमारे १८ कोटी रुपये निधीतून सुरू करण्यात आलेल्या 'कार्डियाक कॅथलॅब'चा रुग्णांना मोठा लाभ होत आहे. या लॅबमध्ये आतापर्यंत १३ रुग्णांची अँजिओग्राफी, ३ रुग्णांची अँजिओप्लास्टी आणि ७७ रुग्णांची '२-डी इको' चाचणी यशस्वीरित्या करण्यात आली आहे. याशिवाय, गंभीर रुग्णांवर जिल्ह्यातच उपचार व्हावेत यासाठी उभारण्यात येत असलेल्या 'क्रिटिकल केअर युनिट'च्या इमारतीचे काम ६० टक्के पूर्ण झाले असून, लवकरच ते रुग्णसेवेत दाखल होईल, असेही पालकमंत्र्यांनी सांगितले.

सर्वसामान्यांना दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी आयुष्यमान भारत योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. २०२४-२५ या वर्षात जिल्ह्यातील २४ हजार ४६४ लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेतला असून, शासनाच्या माध्यमातून संबंधित रुग्णालयांना उपचारापोटी ६१ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

जिल्ह्यात गर्भलिंग निदान चाचणीचे प्रकार रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन व आरोग्य विभागाला कडक निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः याबाबीचा नियमित आढावा घेऊन अशा गैरप्रकारांना आळा घालण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

## दिवा शहरात मतदान उत्साहात तर अनेक केंद्रांवर रांगा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

दिवा शहरात मतदान उत्साहात पार पडलेले दिसून आले तर अनेक मतदान केंद्रांवर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. दिवा शहरातील सर्व उमेदवारांचे भविष्य मतपेटीत जमा झाले असून आज ठाणे महानगरपालिकेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाकडे उमेदवारांचे लक्ष लागले आहे. दिवा शहरातून ठाणे महानगर पालिकेत एकूण ११ नगरसेवक जाणार असून रखडलेली निवडणुक आज सेंट मेरी शाळेत ईव्हीएम मशीन ३५ मिनिटे बंद पडल्याची घटना वगळता दिव्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदान शांततेत पार पडले असून भावी नगरसेवकांचे भावितव्य आज स्पष्ट होणार आहे. गुरूवारी सकाळीच मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी रांगा दिसून आल्या तर आपण नगरसेवक व्हायचेच आहे म्हणून गेल्या आठ वर्षापासून लोकांची कामे करणारे उत्साही कार्यकर्ते, माजी नगरसेवक यांनी सकाळपासून आपल्या मतदारांना कार्यकर्ते लावून घराबाहेर काढण्यास सुरूवात केली होती. दिव्यात सततची वाहतुक कोंडी आणि अशा अनेक समस्यांमुळे त्रस्त असलेला कार्पोरेट, मध्यमवर्गिय घरातील मतदार मुठी आवळून मतदानासाठी बाहेर पडला होता. या सगळ्या समस्या सोडविण्याचे मतदान हे एकमेव साधन आपल्या हातात आहे. हाच विचार करून ही मंडळी यावेळी पर्यटनाचा, सुट्टी म्हणून घरात आराम करू असा विचार न करता बाहेर पडली होती. शाळेला सुट्टी असल्याने या मंडळींची शाळकरी मुले मतदान म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी आपल्या आई, वडिलांच्या सोबत आली होती.

## मंत्री संजय राठोड यांनी घेतले साईबाबांच्या समाधीचे दर्शन!




**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज शिर्डी येथे श्री साईबाबांची समाधी येथे दर्शन घेतले. दर्शनानंतर त्यांनी श्री साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. या प्रसंगी श्री साईबाबा संस्थान यांच्या वतीने जनसंपर्क अधिकारी दिपक लोखंडे यांनी मंत्री संजय राठोड यांचा शाल व पुष्पहार घालून सन्मानपूर्वक सत्कार केला. सदर भेटीदरम्यान संस्थानच्या कार्यपद्धतीबाबत व भाविकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत थोडक्यात चर्चा झाली. मंत्री राठोड यांनी संस्थानच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करत भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्याचे आश्वासन दिले.

## अठराव्या 'एक्सपो' चे दिमाखात उद्घाटन !

- उत्कृष्ट नियोजन, प्रचंड प्रतिसाद यामुळे संगमनेरचा सफायर बिझनेस एक्सपो महाराष्ट्रात लोकप्रिय- नगरसेविका रचना मालपाणी

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

"विविध क्षेत्रातील नामवंत कंपन्यांचा सहभाग उत्कृष्ट नियोजन आणि नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद यामुळे लायन्स सफायर च्या वतीने आयोजित करण्यात येणारा सफायर बिझनेस एक्सपो संपूर्ण राज्यात प्रचंड लोकप्रिय ठरला आहे. प्रत्येक वर्षी त्याची व्याप्ती वाढत चालली आहे. सलग अठरा वर्षे मिळविलेले हे यश खरोखर अभ्यासाचा विषय आहे" असे प्रतिपादन नगरसेविका सौ. रचना मालपाणी यांनी येथे केले.

15 जानेवारी ते 21 जानेवारी असे सात दिवस मालपाणी लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या सफायर बिझनेस एक्सपोचे उद्घाटन सौ मालपाणी यांच्या हस्ते संपन्न झाले . तेव्हा झालेल्या उद्घाटन सोहळ्यात मनोगत व्यक्त करताना त्यांनी वरील भावना बोलून दाखविल्या. यावेळी व्यासपीठावर, सौ नीलम खताळ, सफायरचे संस्थापक उद्योगपती गिरीश मालपाणी, प्रकल्प प्रमुख प्रफुल्ल खिवंसरा, श्रीनिवास भंडारी, अध्यक्ष कल्याण कासट, सेक्रेटरी सुमित मणियार, खजिनदार नामदेव मुळे, स्टॉल धारकांचे




प्रतिनिधी डॉक्टर सुरेंद्र महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

नगरसेविका सौ मालपाणी आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की "नाविन्याची परंपरा जपल्यामुळे सफायर बिझनेस एक्सपो 18 वर्षे होऊन देखील नवीन, ताजा आणि टवटवीत वाटतो. खरेदी, मनोरंजन आणि मेजवानी यांचा सुरेख त्रिवेणी संगम या ठिकाणी पाहायला मिळतो. संगमनेर तालुका सर्वार्थाने समृद्ध आहे. येथील समृद्ध कृषी संस्कृतीला सचोटीच्या संस्कारातील व्यापारी क्षेत्राची साथ आहे. त्यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत असते. बिझनेस एक्सपोमुळे एकाच ठिकाणी विविध प्रकारची उत्पादने बघणे, खरेदी करणे इत्यादी गोष्टी शक्य होतात. त्यामुळे महिला वर्गासाठी तर हे वरदान ठरले आहे. यंदाचा एक्सपो देखील गर्दीचे उच्चांक प्रस्थापित करील"

सौ खताळ यांनी आपल्या भाषणामध्ये सफायर बिझनेस एक्सपो ची मुक्तकंठाने प्रशंसा केली. आमदार अमोलजी खताळ महत्त्वाच्या कामानिमित्त मुंबई येथे असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाही त्यांच्या वतीने या भव्य एक्सपोला शुभेच्छा देण्यासाठी मी या ठिकाणी आले आहे असे त्या म्हणाल्या..

हा एक्सपो म्हणजे संगमनेरचे वैशिष्ट्य ठरला आहे असे त्या म्हणाल्या. सर्व वयोगटातील नागरिकांना त्यांच्या आवडीनिवडीनुसार वस्तू, खाद्यपदार्थ , मनपसंत उपकरणे मिळण्याचे हे हक्काचे ठिकाण झाले आहे असे मत त्यांनी मांडले.

गिरीश मालपाणी यांनी स्वागतपर भाषणामध्ये एक्सपो पाठीमागील भूमिका विषद केली. "अठरा वर्षांच्या सलग अनुभवातून आम्ही सातत्यपूर्ण सुधारणा करीत असल्याने स्टॉलच्या बुकिंग साठी राज्यभरातून प्रचंड मोठी वेटिंग लिस्ट असते. प्रत्येक वर्षी 25% नवीन स्टॉल धारक दाखल होतात. आम्ही नियोजनबद्ध रीतीने जाहिरात मोहीम राबवतो. आमची प्रकल्प समिती अडीच तीन महिने या प्रकल्पावर प्रचंड मेहनत घेते आणि गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने अठरा वर्षे हा एक्सपो निर्विघ्नपणे पार पडतो. एमबीएचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी हा बिझनेस एक्सपो म्हणजे प्रात्यक्षिकातून शिक्षण देणारा एक पथदर्शक प्रकल्प ठरला आहे" असे ते म्हणाले.

सफायरने तयार केलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन यावेळी व्यासपीठावर सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

## मराठी भाषेचा गौरव करत १९७९ च्या वर्गमित्रांचे स्नेह संमेलन उत्साहात संपन्न

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

मराठी भाषेचा गौरव करत अत्यंत भाऊक वातावरणात सन १९७९ साली १० वी वर्गात शिकत असलेल्या हुतात्मा माधव विद्यालय, जिल्हा परिषद हायस्कुल मुलांचे व मुलींचे विद्यार्थ्यांचे स्नेह संमेलन आनंदी वातावरणात संपन्न झाले. ४६ वर्षानंतर एका ठिकाणी आल्यामुळे एकमेकाला गळाभेट घेवून प्रेम व्यक्त करण्यात आले.शहरातील प्रमुख मार्गाने नगरफेरी काढून मराठी मातृभाषा विषयाचे जागरण केले. छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. ज्येष्ठ बंधू म्हणून सुरेश आंबुलगेकर,रमेश परकंठे,मलिकार्जुन एकाळे




यांनी सर्व विद्यार्थ्यांचा उपरणे व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुखेड भूषण डॉ.दिलीप पुंडे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त कृषी संचालक सुरेश आंबुलगेकर व सेवानिवृत्त सचिव उल्हास देबडवार हे होते. व्यासपीठावर गुरुवर्य किशनराव किडे, टि.व्ही.सोनटक्के,धुप्पेकर गुरुजी, एम.व्ही. शृंगारे, एस.बी. कॅदरकुंटे, व्ही.व्ही.कामशेट्टे, बी.जी.पेठकर, शं.गो.मुंडे, माकणे गुरुजी, एम.एम.टाकळे,कौसल्ये गुरुजी,हुमाविचे मुख्याध्यापक राजेश पडलवार आदिंची उपस्थिती होती. शाळेची आठवण म्हणून घंटा वाजवून शाळा भरविण्यात आली. प्रार्थनेनंतर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. विश्वनाथ बंडे यांनी स्वागीत गित व प्रस्तावना केली. विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी म्हणून इंजि.माधव वाघमारे व विजय दीक्षित यांनी आपले मनोगत व्यक्त केले. समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौधरी,सचिव शिवाजी कोनापूरे,उपाध्यक्ष बालाजी बंडे,कोषाध्यक्ष ऐड.श्रीधर मुखेडकर,संयोजक विश्वनाथ बंडे व समितीच्या सर्व सदस्यांनी उपस्थित गुरुजनांचा व मान्यवरांचा शाल,श्रीफळ,पुष्पहार व स्मृतीचिन्ह देवून सत्कार केला. याप्रसंगी उल्हास देबडवार,सुरेश आंबुलगेकर, टि.व्ही.सोनटक्के गुरुजी यांची भाषणे झाली. सर्व वक्त्यानी पुढील आयुष्य निरोगी जगण्यासाठी मोलाचा सल्ला दिला. डॉ.दिलीप पुंडे यांनी मेडिकलच्या गोळ्या न खाता मित्रांच्या टोळ्यात राहून आनंदी जीवन जगा असा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे सुरेख संचलन प्रा.विश्वाभर इंगोले यांनी केले तर आभार बालाजी बंडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राजाभाऊ कुलकर्णी,ज्ञानेश्वर पाळेकर,शिवाजी एगाडे,शंभू कवटिकवार, मनोहर धुळशेट्टे,बाबु पाटील उमाटे,चंद्रकांत चिवळे,नरहरी नारलावार,किशन नारलावार, देविदास मामिलवाड, नागनाथ निलमवार, मारोती खतगावे,विठ्ठल पाटील चिद्रावार आदींनी परिश्रम घेतले. पुढच्या वर्षी नांदेड येथे स्नेह संमेलन घेण्याचे निश्चित करुन विश्वनाथ बंडे यांच्या गायनानंतर समारोप करण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# सुनावणीत लेखी म्हणणे नाकारले

## एसटी कार्यकारी अभियंत्याच्या भूमिकेवर संशय, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



**वसमत : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यकारी अभियंता कार्यालयात झालेल्या सुनावणीदरम्यान अपीलार्थीचे लेखी म्हणणे स्वीकारले न गेल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, या प्रकरणामुळे एसटी महामंडळाच्या कार्यपद्धतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात वसमत येथील पत्रकार मुनिरोदीन सयफौदीन फारुखी यांनी हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी संबंधित अपीलावर सुनावणी आयोजित करण्यात आली होती. कार्यालयाकडून मिळालेल्या पत्रानुसार अपीलार्थी वेळेत सुनावणीस हजर राहिले होते. मात्र, सुनावणीदरम्यान अपीलार्थीचे लेखी स्वरूपातील म्हणणे स्वीकारण्यास थेट नकार देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. कोणताही लेखी आदेश न देता तक्रार निकाली काढण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणात कार्यकारी अभियंता व संबंधित ठेकेदार हे एकाच गावचे असल्याने पक्षपाताचा संशय अधिक बळावल्याचे तक्रार अर्जात नमूद आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना पायदळी तुडवत, अपीलार्थीला आपली बाजू मांडण्याची संधी न देता निर्णय घेण्यात आल्यास हा प्रशासनाचा गंभीर अपयश ठरेल, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

अपील संभाजीनगर येथे झाले असले, तरी अपीलार्थी हिंगोली जिल्ह्याचा रहिवासी असल्याने प्रशासकीय अनियमिततेच्या मुद्द्यावर हिंगोली जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार सादर करण्यात आली आहे. तक्रारीत सदर सुनावणीचा निर्णय नियमबाह्य ठरल्यास तो रद्द करून प्रकरणाची पुनःसुनावणी घ्यावी, तसेच संबंधित कार्यकारी अभियंत्याकडून लेखी खुलासा मागवावा, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

सुनावणी 'निकाली' काढण्याची घाई नेमकी कुणासाठी होती? नियम पाळले गेले की सोयीचे निर्णय घेतले गेले? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आता जिल्हाधिकारी काय देतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# वसमत नगर परिषदेत सत्ताधाऱ्यांचा दबदबा




**वसमत : (समर्थ गांवकरी)**

नगर परिषद सभागृहात आज झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत उपनगराध्यक्ष व स्वीकृत सदस्यांच्या निवडीची प्रक्रिया शांततेत व बिनविरोध पार पडली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवक सय्यद इमरान अली यांची बिनविरोध उपनगराध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका अधिक भक्कम झाली आहे. याच सभेत नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी रत्नाकर अडशिरे, दीपक कटेकर आणि मुजीब पठाण यांची निवड करण्यात आली. या तिघांनाही सामाजिक, व प्रशासकीय क्षेत्रातील अनुभव असल्याने नगर परिषदेच्या निर्णयप्रक्रियेला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष उपस्थित होत्या.

निवड प्रक्रिया पार पडल्यानंतर नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष सय्यद इमरान अली यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नगराध्यक्ष, नगरसेवक आणि प्रशासन यांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य व मूलभूत सुविधांना प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

स्वीकृत सदस्य म्हणून निवड झालेल्या रत्नाकर अडशिरे, दीपक कटेकर आणि मुजीब पठाण यांनीही नगर परिषदेच्या माध्यमातून शहराच्या प्रगतीसाठी आपला अनुभव व ज्ञान वापरण्याचे आश्वासन दिले.

या निवडीमुळे वसमत नगर परिषदेत सत्ताधारी पक्षाची ताकद अधिक वाढली असून येत्या काळात शहर विकासाचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन मुख्याधिकारी रफिक कांकड, शिकारी, नगरपरिषद कर्मचारी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले.

# संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेचे शासकीय चित्रकला परीक्षेत घवघवीत यश



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या शासकीय रेखाचित्रकला परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. श्रीगोंदा तालुक्यातील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेने या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून शाळेचा दोन्ही परीक्षांचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये एकूण ९८ विद्यार्थ्यांनी विशेष श्रेणी प्राप्त केली आहे.

एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत अमृता भवर, अनघा वेताळ, दिव्या टिळेकर, गायत्री गणवीर, कल्याणी दिवटे, प्राजक्ता दैठणकर, पूर्वा वाघमारे, राघवी हार्दे, संचिता हार्दे, श्रद्धा पवार, श्रावणी वाळके, सूरज टिळेकर, तृप्ती आढाव व वैष्णवी सातव या विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे.

इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत आदेश ताम्हाणे, आदित्य ताम्हाणे, अनुष्का उंडे, आयेशा शेख, चैत्राली ताम्हाणे, धनश्री वाखारे, हर्षदा वेताळ, ईश्वरी ओहोळ, कार्तिक अवचिते, कार्तिकी खोसे, मयुरी ताम्हाणे, प्राची औटी, प्रांजल वाघमारे, प्रतिक कोरके, साई पठारे, समिक्षा आढाव, समिक्षा यादव, समृद्धी भालसिंग, शिवानी हार्दे, तेजस्विनी ताम्हाणे, वैष्णवी साबळे, वैष्णवी बोरगे व योगिता बनकर या विद्यार्थ्यांनी 'अ' श्रेणी प्राप्त केली आहे. तसेच एलिमेंटरी ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत २७ तर इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेत ३३ विद्यार्थ्यांनी 'ब' श्रेणी प्राप्त केली आहे. या सर्व विद्यार्थ्यांना कलाध्यापक संदीप वेताळ यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल शिरूर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष चंदूलालजी चोरडीया, मुख्याध्यापक बी. बी. डोके, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे, सर्व शिक्षकवृंद व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# आज कवी भास्कर गीते आकाशवाणीवर

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

येथील प्रसिद्ध कवी भास्कर अर्जूनराव गीते यांचे काव्यवाचन आज शुक्रवारी, दि.१६ जानेवारी रोजी सकाळी १०.४५ वाजता नांदेड आकाशवाणीवरुन 'लोकजागर' या कार्यक्रमात प्रसारित होणार आहे. कवी भास्कर गीते हे एसटी महामंडळाच्या नांदेड विभागीय कार्यालयात वरिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी विविध ठिकाणच्या मराठी साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून कविता सादर केल्या आहेत. आजपर्यंत त्यांनी २५० पेक्षा अधिक कविता लिहिल्या आहेत. त्यांचा 'अवकाळी पाऊस' काव्यसंग्रह लवकरच प्रकाशित होणार आहे. विविध वर्तमानपत्रे व साप्ताहिकातून त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत.

# व्याख्यानमाला व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील लोकनेते स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे प्रतिष्ठान आणि श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांच्या जयंती महोत्सवानिमित्त प्रबोधन व्याख्यानमाला तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठान व संस्थेचे अध्यक्ष मा. राजेंद्रदादा शिवाजीराव नागवडे यांनी दिली.

हा जयंती महोत्सव दिनांक १६ ते २० जानेवारी या कालावधीत साजरा करण्यात येणार असून, यंदा प्रबोधन व्याख्यानमालेचे १८ वे वर्ष आहे.



दिनांक १७ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता प्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते व ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे हे 'उद्याच्या आनंदासाठी' या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत.

दिनांक १८ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता दैनिक लोकमत, पुणेचे संपादक मा. संजय आवटे हे 'चला उभारूया युवा पिढी' या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत.

तिसरे पुष्प ह.भ.प. अविनाश महाराज भारती यांचे 'भारतीय संस्कृती आणि आजची तरुणाई' या विषयावर दिनांक १९ जानेवारी रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

लोकनेते स्व. बापूंच्या जयंतीदिनी १९ जानेवारी रोजी रक्तदान शिबीर तसेच अभिवादन प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २० जानेवारी रोजी महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ प्रसिद्ध कवयित्री मा. गुंजन पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न होणार असून, यावेळी त्यांच्या हृदयस्पर्शी कवितांचे काव्यधारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले आहे.

प्रबोधन व्याख्यानमालेच्या माध्यमातून आजवर अनेक दिग्गज साहित्यिक, विचारवंत व समाजसुधारकांची व्याख्याने आयोजित करून तालुक्यातील जनतेसाठी विचारांची मांदियाळी सातत्याने सुरू ठेवण्यात आली असल्याचेही मा. राजेंद्रदादा नागवडे यांनी नमूद केले.

या महोत्सवानिमित्त महाविद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आनंदी बाजार, पाककला, क्रीडा स्पर्धा, रांगोळी, मेहंदी, वक्तृत्व, निबंध व काव्यवाचन स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. तसेच एकांकिका, विविध गुणदर्शन कार्यक्रमांसह बॉलिवूड डे, ट्रॅडिशनल डे, मिसमॅच डे यांसारखे उपक्रमही राबविण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांनी दिली.

प्रबोधन व्याख्यानमाला व स्नेहसंमेलनाच्या सर्व कार्यक्रमांना विद्यार्थी, पालक, महिला-भगिनी, तरुणाई व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी आणि प्रतिष्ठानचे अध्यक्ष व नागवडे कारखान्याचे चेअरमन मा. राजेंद्रदादा नागवडे यांनी केले आहे.

# कठोर परिश्रमाने यशाला गवसणी घालता येते : सुरवसे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच जनता कन्या विद्यालय यांच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत "शाखा तेथे समुपदेशक" या उपक्रमाअंतर्गत "मी कोण होणार?" या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी १४ जानेवारी (करिअर डे) ते २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन) दरम्यान व्यवसाय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिराचे उद्घाटन आज जिल्हा उपनिबंधक श्री. मंगेशजी सुरवसे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते, ॲड. विठ्ठलराव काकडे तसेच सर्व सेवक उपस्थित होते. शिबिराच्या पहिल्या दिवशी उपनिबंधक श्री. मंगेशजी सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकारमहर्षी काष्टी सेवा सोसायटीचे चेअरमन राकेश पाचपुते होते.

जनता विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य शिवप्रसाद मेहेत्रे यांनी प्रास्ताविक केले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सुरवसे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, कठोर परिश्रमाला कोणताही पर्याय नाही; सातत्याने परिश्रम केल्यास यश निश्चितच मिळते. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन, वेळेचा सदुपयोग आणि चांगले आरोग्य जपल्यास यश प्राप्त होते, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तसेच सामाजिक जीवन जगताना महिलांचा आदर करणे, सार्वजनिक स्वच्छता पाळणे, व्यसनांपासून दूर राहणे आणि प्रदूषण टाळणे यावर त्यांनी भर दिला. पौराणिक कर्ण, दुर्योधन व अर्जुन यांच्या कथांमधील दाखले देत योग्य संगत आणि चांगल्या मार्गदर्शकाचे महत्त्व त्यांनी विशद केले. आपल्या शालेय जीवनातील परिश्रमांमुळेच आपण आज या पदावर आहोत, असे सांगताना त्यांनी आई-वडील आणि गुरूंप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

ॲड. विठ्ठलराव काकडे यांनी विद्यार्थ्यांनी चांगला आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवनात यश संपादन करावे, असे आवाहन केले. सह सेवा संस्थेचे अध्यक्ष राकेशभाऊ पाचपुते यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या व्यवसाय मार्गदर्शनाची नितांत गरज असल्याचे सांगून हा उपक्रम राबवल्याबद्दल विद्यालयाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून त्यानुसार प्रयत्न करावेत आणि चांगले मित्र जोपासून आयुष्य उज्वल करावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. मंगल जोगदंड यांनी आभार प्रदर्शन केले. तर आर.एस.पी.चे तालुका समन्वयक व समुपदेशक श्री. हरिश्चंद्र शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम आनंदी व उत्साही वातावरणात पार पडला.

# सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने १५ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत सिकलसेल तपासणी विशेष पंधरवडा राबविण्यात येत असून, या अभियानाअंतर्गत घरोघरी तपासणी, निदान, उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती किनवट शहर नागरी दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण नेम्मानिवार यांनी दिली. राज्यात सिकलसेल आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या २१ जिल्ह्यांतील प्रत्येक नागरिकाची सिकलसेल तपासणी करण्याचा संकल्प सार्वजनिक आरोग्य विभागाने केला असून, किनवट शहर व तालुक्यातील नागरिकांनी या विशेष मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही डॉ. नेम्मानिवार यांनी केले आहे.

# सभासद शेतकऱ्यांनी नागवडे कारखान्यास ऊस गळीतासाठी देऊन सहकार्य करावे – चेअरमन राजेंद्र दादा नागवडे

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी स्व. शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचा ५१ वा गळीत हंगाम सध्या सुरू असून सभासद व ऊस उत्पादक शेतकरी, ऊसतोड मुकादम, मजूर, वाहतूकदार व ठेकेदार यांच्या सहकार्याने गळीत हंगाम अतिशय सुरळीत व यशस्वीपणे सुरू आहे.

आजअखेर कारखान्याने एकूण ४ लाख ७२ हजार ३४० मेट्रिक टन ऊसाचे गाळप केले असून सरासरी प्रतिदिन ६,५०० मेट्रिक टन ऊस गाळप होत आहे. कारखान्याचा गळीत हंगाम १० फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार असल्याने सभासद शेतकऱ्यांनी आपला ऊस इतर कारखान्यांना न देता नागवडे कारखान्यास गळीतासाठी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांनी केले आहे.



यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नागवडे म्हणाले की, चालू गळीत हंगामात कारखान्याने उच्चांकी ३,१५० रुपये प्रति मेट्रिक टन ऊस दर जाहीर केला असून त्यापैकी ३,००० रुपयांचा पहिला हप्ता आतापर्यंत अदा करण्यात आला आहे. नागवडे सहकारी साखर कारखाना ऊस दराच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर राहिला असून सभासद शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका कायम ठेवली आहे.

ते पुढे म्हणाले की, कारखान्याचे संस्थापक स्व. शिवाजीराव (बापू) नागवडे यांनी सभासद शेतकऱ्यांना योग्य न्याय देण्याची सातत्यपूर्ण भूमिका घेतली. त्यांच्या विचारांचा व संस्कारांचा वारसा पुढे नेत आजही कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे.

सहकारी साखर कारखानदारीसमोर सध्या अनेक आव्हाने असली तरी त्यावर मात करत नागवडे सहकारी साखर कारखाना सातत्याने प्रगतीकडे वाटचाल करीत आहे. हा कारखाना तालुक्याची 'सहकार गंगोत्री' व विकासाची मूलभूत मातृसंस्था असून आतापर्यंत सभासद शेतकऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

# बोला तुम्ही, बक्षीस देतो आम्ही उपक्रमामुळे आत्मविश्वास वाढला

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्याचा विकास होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा, या उद्देशाने लोहा तालुक्यातील आष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी टोम्पे यांच्या संकल्पनेतून बोला तुम्ही, बक्षीस देतो आम्ही हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात विद्यार्थ्यांना भाषण, संभाषण व आपले मत मांडण्याची संधी दिली जाते. त्यामुळे विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होत असून त्यांच्यात सभाधिटपणा, प्रसंगावधान व संवाद कौशल्याचा विकास होत आहे. विविध विषयांवर मुक्तपणे विचार मांडण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे. उपक्रमात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना



शैक्षणिक साहित्य, रोख बक्षिसे तसेच थोर व्यक्ती व राष्ट्रीय नेत्यांची पुस्तके देऊन सन्मानित करण्यात येते. जयंती, पुण्यतिथी व दैनिक परिपाठाच्या माध्यमातून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासह सर्व सहभागी विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले जाते.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची गोडी निर्माण झाली असून स्पर्धात्मक परीक्षांकडे सकारात्मक दृष्टीकोन विकसित होत आहे. विद्यार्थ्यांचा सहभाग वाढत असून ते विविध कार्यक्रमांमध्ये आत्मविश्वासाने आपले मत मांडताना दिसत आहेत.

# भाजी भाकरीच्या महाप्रसादासाठी जनसागर उसळला

- दोन लाखावर भाविकांनी घेतला महाप्रसादाचा आस्वाद
- ३०० क्विंटलवर ज्वारीच्या भाकरी ५०० क्विंटलवर मिश्र भाजी होती

**तामसा : (समर्थ गांवकरी)**

तामसा येथील बारालिंग देवस्थानच्या ऐतिहासिक भाजी भाकरीचा सोहळा परंपरेनुसार मोठ्या थाटात आणि जल्लोषात पार पडला असून पंचक्रोशीसह विविध जिल्हे राज्यातील सुमारे दोन लाखावर भाविकांनी भाजी भाकरी महाप्रसादाचा आस्वाद घेतला आहे. पाच क्विंटल भाजी व चार क्विंटल ज्वारीच्या भाकरीची लूट भाविकांनी केली आहे.



मकर संक्रातीचे 'करि' दिनी अर्थात दिनांक १५जानेवारी गुरुवारी मोठ्या उत्साहात आणि उल्हासात पार पडली. पहाटे बारालिंग महादेवाचा अभिषेक, भजन, पूजन, महाआरतीनंतर नैवद्य भरवून दहा वाजता भाजीभाकरीचा महाप्रसाद रांगेतून वाटण्यास सुरुवात झाली. सुमारे दोन लाख व त्यापेक्षाही जास्त भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा आस्वाद घेतला. देवस्थानच्या भाजीभाकरी महाप्रसादाच्या पर्वणीला सुमारे पावणे दोनशे वर्षाची परंपरा आहे. केवळ भाजी भाकरी हे महाप्रसादाचे खास वैशिष्ट्य मानले जाते. मंदिराचे पुजारी रेवण महाराज कंठाळे यांचे पूर्वज महादलिंग महाराज कंठाळे यांनी पावणे दोनशे वर्षांपूर्वी ग्रामस्थांच्या मदतीने बारालिंग देवस्थानात भाजीभाकरीच्या महाप्रसादाची प्रथा सुरू केली होती. ती परंपरा तामसेकर तितक्याच तत्परतेने चालवतात. पान भाज्या, फुल भाज्या, फळ भाज्या, शेंग बाजा, मूळ भाज्या, केळी, पपई, बोर, जांब, गाजर, फूलगोभी पण गोबी, बैंगन, बिबा, मुळगा अशा विविध प्रकारच्या भाज्या एकत्र करून मिश्र भाजी बनवण्यात आली होती. भाजीसाठी तेल, मसाल्याचा वापर नव्हता. नैसर्गिक व आयुर्वेदिक मिश्र भाजी खाऊन भाविक तृप्त झाले. दिवसभर गुळवणाच्या दोन कढईत भाजी शिजवली. हजारो हात कामाला लागले होते. एक भाकरी त्यावर भाजी असा महाप्रसाद रांगेतून वाटप करण्यात आला. मंदिराचे पुजारी रेवण महाराज कंठाळेसह मंदिर मंदिर समितीचे अध्यक्ष संतोष निलावार, रमेश घंटेलवार, रवी बंडेवार, दिलीप बाष्ठेवाड, सुभाष धरमुरे, सुरेश देशमुख, गणपत हनवते बंडू बंडेवारसह तामसेकरानी मोठे परिश्रम घेतले. बारालिंग देवस्थानच्या भाजीबाकीच्या सोहळ्यासाठी तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर, हदगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संकेत दिघे, फौजदार बालाजी नरोटे, फौजदार रामेश्वर कत्ते, एएसआय अशोक शिंगणवाड, बीट जमादार श्यामसुंदर नागरगोजे, डीएसबीप्रमुख प्रकाश कबलेसह पोलीस मित्र संघटना नई दिल्ली चे प्रमुख ११० पोलीस मित्र यांनी चोक पोलीस बंदोबस्त ठेवला होता. यावर्षी ३०० च्या वर क्विंटल ज्वारीच्या भाकरी व ५०० वर क्विंटलची मिश्र भाजी बनवण्यात आली होती. ग्रामपंचायत सदस्य साहेबराव देशमुख यांच्या ५ क्विंटल ज्वारीच्या भाकरी होत्या, सारंग लाभशेटवार यांनी ५००० पाणी बॉटल व फिल्टर पाणी अनलिमिटेड वाटप केले. भजी भाकरीचा आस्वाद घेण्यासाठी माजी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, भास्कर वानखेडे, कृष्णा पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, संभाजी लांडगे, भाजपाचे भागवत देवसरकर, गटविकास अधिकारी आडेराघो, तालुका आरोग्य अधिकारी संजय मुरमुरे, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर गोपीकृष्ण पाटील डॉक्टर राम मुसांडे, कार्यकारी अभियंता संजय शिंदे यांचे सह तालुका भरातील राजकीय सामाजिक नेते पुढारी यांनी भाजी भाकरीचा आस्वाद घेतला.

# प्रदूषण, विकास आणि विनाश



## संपादकीय



प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय संकट ही भविष्यातील नाहीत, तर आजचीच वास्तव समस्या आहे. याकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर अंदाधुंद विकासाची किंमत आपल्याला आणि येणाऱ्या पिढ्यांना प्रचंड मोजावी लागेल. शास्त्रज्ञांनी सांगितलेल्या उपाययोजना, पर्यावरणपूरक विकास, नैसर्गिक संसाधनांचा समतोल वापर आणि सर्वांची सामूहिक जबाबदारी यातूनच या संकटावर मात करता येईल. अन्यथा विकासाच्या नावाखाली आपण स्वतःचाच विनाश ओढवून घेतो आहोत हे वास्तव स्वीकारावे लागेल.

जगातील अनेक देश आज प्रदूषणाच्या संकटाशी झुंज देत असले तरी भारतात या समस्येने अत्यंत गंभीर आणि भयावह स्वरूप धारण केले आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि तथाकथित विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास आता थेट मानवी जीवनावर घाला घालू लागला आहे. नुकताच पर्यावरण आणि प्रदूषणाविषयी 'लॅन्सेट' या नामांकित आंतरराष्ट्रीय नियतकालिकाचा सर्वेक्षण अहवाल प्रसिद्ध झाला. त्यानंतर मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या 'इमोनीड्स' या संस्थेचाही अहवाल समोर आला. या दोन्ही अहवालांनी केवळ भारतालाच नव्हे, तर संपूर्ण जगालाच हादरवून सोडले आहे. विशेषतः भारतासाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. कारण विकासाच्या गतीसोबत पर्यावरण संरक्षणाचा समतोल राखण्यात आपण अपयशी ठरत आहोत. प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक असलेली राजकीय इच्छाशक्ती, दीर्घकालीन धोरणे आणि कडक अंमलबजावणी यांचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. याचे दुष्परिणाम आता केवळ निसर्गावरच नव्हे, तर थेट मानवी आरोग्यावर दिसून येत आहेत.

'लॅन्सेट' आणि 'इमोनीड्स' च्या अहवालानुसार वायू गुणवत्ता निर्देशांक (AQI) सातत्याने 400 च्या वर राहणे ही अत्यंत धोकादायक बाब आहे. एवढ्या उच्च पातळीवरील प्रदूषणामुळे लोकांच्या शारीरिक आरोग्याला मोठा फटका बसत असून मानसिक आरोग्यही गंभीर धोक्यात आले आहे. आज लहान मुलेसुद्धा या संकटाच्या कचाट्यात सापडली आहेत. शाळकरी वयातील मुलांमध्ये श्वसन विकार, एकाग्रतेचा अभाव, स्मरणशक्तीशी संबंधित समस्या वाढताना दिसत आहेत. प्रदूषणामुळे केवळ दमा, खोकला किंवा श्वसनाचे त्रासच वाढले नाहीत, तर हृदयविकार, उच्च रक्तदाब, ॲलर्जी यांसारख्या आजारांमध्येही लक्षणीय वाढ झाली आहे. याहूनही गंभीर बाब म्हणजे अल्झायमर आणि पार्किन्सनसारख्या न्यूरोलॉजिकल आजारांचा धोका वाढत असल्याचे संशोधनातून स्पष्ट झाले आहे. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, प्रदूषणामुळे लोकांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होत आहे. परिणामी, अनेकदा अँटिबायोटिक औषधेही प्रभावी ठरत नसल्याची धोकादायक परिस्थिती निर्माण झाली आहे. देशात सातत्याने वाढणाऱ्या प्रदूषणाचा परिणाम केवळ आरोग्यापुरता मर्यादित राहिलेला नाही. याचा थेट फटका ऋतुचक्राला बसत आहे. जागतिक तापमानवाढीमुळे हवामानात असामान्य बदल घडत आहेत. कधी अवकाळी पाऊस, कधी दीर्घकाळ दुष्काळ, तर कधी अचानक ढगफुटी अशा टोकाच्या घटना वारंवार घडू लागल्या आहेत.

## दै. समर्थ गांवकरी सूडोकू क्र. ७१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | | 2 | | | 9 | 6 | | 5 |
| | 8 | | | | | 9 | | |
| | 9 | | 5 | 8 | | | 4 | 1 |
| | | | | | | | 2 | 8 |
| 2 | 5 | | 8 | 4 | 7 | | 9 | 6 |
| 8 | 7 | | | | | | | |
| 4 | 3 | | | 9 | 6 | | 5 | |
| | | 1 | | | | | 6 | |
| 5 | | 8 | 2 | | | 3 | | 9 |

उत्तर उद्याच्या अंकात

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

### सूडोकू क्र. ७० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 9 | 8 | 2 | 4 | 6 | 1 | 3 | 5 |
| 3 | 1 | 6 | 5 | 7 | 9 | 8 | 4 | 2 |
| 2 | 4 | 5 | 3 | 8 | 1 | 7 | 9 | 6 |
| 4 | 3 | 7 | 6 | 5 | 8 | 2 | 1 | 9 |
| 5 | 8 | 9 | 1 | 2 | 4 | 6 | 7 | 3 |
| 6 | 2 | 1 | 9 | 3 | 7 | 5 | 8 | 4 |
| 9 | 7 | 2 | 8 | 6 | 3 | 4 | 5 | 1 |
| 1 | 5 | 4 | 7 | 9 | 2 | 3 | 6 | 8 |
| 8 | 6 | 3 | 4 | 1 | 5 | 9 | 2 | 7 |

**पंचांग**
१६ जानेवारी २०२५
शुक्रवार
विक्रम संवत्- २०८२
पौष शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम

अयन- उत्तरायणारंभ
मास- पौष
ऋतु- सौर शिशिर
कृष्ण पक्ष
तिथि:त्रयोदशी २२:२१:५८

नक्षत्र:मूल (अहोरात्र)
योग:ध्रुव २१:०५:५९
करण:गर ०९:२२:०२
करण:वणिज २२:२१:५८
सूर्य:मकर
चन्द्र:धनु०५:४७:२८

## उपदेशाचे डोस

### प्रोत्साहन

संमोहनशास्त्राचा जनक आबे फारीय (१७५६-१८२०) हा गोवेकर होता. कांदोली गावचा हा ख्रिस्ती मुलगा बापासह पोर्तुगालला गेला. लिस्बोआ, रोम येथे शिकून पंडित झाला. जन्मभर युरोपातच राहिला पण त्याला आपल्या गोव्याचा अभिमान होता. शणै गोयबाबांनी त्याचे कोकणीत चरित्र लिहलेय. मृत्यूपूर्वी एकच वर्ष आधी म्हणजे १८१९ मध्ये त्याने ड्र लरीीश वू ।ीोशळश्र ड्रीलळवश (ज्ञानेनिद्रेचीकारणे) नावाचा ग्रंथ फ्रेंचमध्ये लिहून नाव मिळविले. एकदा लिस्बोआच्या राजमहालात त्याचे भाषण ठेवण्यात आले होते त्यावेळी पोर्तुगालमधील सारी विद्वत्सभा जमली होती. गोरे, गुलमिशावाले, तालेवार श्रोते. आबे फारीय गांगरला. त्याचे तीर्थरुप आडोशाला उभे होते. त्यांनी परिस्थिती ओळखून कोकणीत धीर दिला. 'कातर रे भाजी!' अकलमंदको इशारा काफी असतो (सूज्ञाला सूचनाही पुरेसे असते.) म्हणतात. मग टाकळ्याची भाजी चिरावी तितक्या सहजतेने त्याने धडाधड भाषण दिले. 'वाहवा' चा पाऊस पडला. मायबोलीतील दोन शब्दांनी जणू आईने पाठ थोपटावी असे काम केले होते.

कथा उपदेश : 'तू फक्त लढ, मी तुझ्या पाठीशी आहे.' एवढे प्रोत्साहनपर शब्द पुरेसे होतात.

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५४७- आयव्हान द टेरिबल या क्रूरकर्मा झारचा राज्याभिषेक.
- २००७- बगदाद विद्यापीठातील आत्मघाती हल्ल्यात ६० जण ठार.
- २००८ - संगणक सॉफ्टवेअर कंपनी 'ॲपल'ने जगातील सर्वात पातळ (दोन सेंटीमीटरपेक्षाही कमी) 'मैकबुक एयर' लॅपटॉप बनविला.

### राष्ट्रीय

- १६८१- संभाजीमहाराजांनी स्वत-स राज्याभिषेक करवून घेतला.
- १९३४- बिहारमधील भूकंपात २० हजार लोक ठार २०व्या शतकातील सर्वाधिक हानिकारक भूकंपापैकी एक मानल्या गेलेल्या या भूकंपात राजेंद्र प्रसाद यांचे कार्य महात्मा गांधीच्या स्तुतीस पात्र ठरले.
- २००७- छत्तीसगडमध्ये नक्षलवाद्यांच्या भूसुरूंग स्फोटात ७ सुरक्षा सैनिक शहीद.


### जन्म

- १८५३- रबरी धावांचे - टायर्सचे एक गठ्ठा घाऊक उत्पादन सुरू करणाऱ्या आँद्रे मिशेलीन या उद्योगपतीचा जन्म.
- १९५६- संगीतकार ओ. पी नय्यर यांचा जन्म.

### निधन

- १७९४- 'डिक्लीन अॅण्ड फॉल ऑफ द रोमन एम्पायर' या महान ग्रांथाचा लेकख एडवर्ड गिबनचे निधन.
- १८०६- मोठ्या प्रमाणवर धुण्याचा साबण बनविण्यासाठी धुण्याच्या सोड्याचे उत्पादक घाऊक प्रम ाणात करण्याची पद्धत शोधणाऱ्या निकोलस लब्लांकचे निधन.
- १९०१- न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे निधन.

## दै. समर्थ गांवकरी जम्बो शब्दकोडे क्र. ७१



**आडवे शब्द**

१. झी मराठीवरील आणखी एक नायिकाप्रधान मालिका!
४. कडा दुमडलेली करंजी
७. मजेत रंगाळत
१२. इच्छित प्राप्तीची आज्ञा
१३. मल्ल
१५. हिंदीत पण-परंतु
१६. कागदी चलन
१७. हिंदी चित्रपटगीतात भेटणारा परमेश्वर
१८. अंगावरील बारीक केस
१९. पत्त्यातील जोडपे
२१. असत्की
२२. लोकनाट्य
२४. नामघोष
२८. विशेष
२९. मृत्तिकाकण
३१. जेमतेम
३३. शिकार
३६. कोळ्यांचा व्यवसाय
३८. शिव शिव
४०. काया व अंत:करण
४३. साडेतीन मुहूर्तांपैकी एक
४५. नवऱ्याची एखादी सवय वा वस्तूही बायकांना हिच्याप्रमाणे वाटू शकते!
४६. वडिलांचे इंग्रजी संबोधन
४७. भूगोलातील एक 'वृत्त'
४८. टॉनिकला आयुर्वेदातील शब्द
४९. शिखराचे टोक
५०. नित्य, सलग
५१. प्रामाणिक
५२. अभिप्राय
५४. निकट, जवळ
५६. पत्र
५८. धाड घालून पिक फस्त करणारा किडा
५९. विनासायास, विनाकारण
६२. छोटे कुबड
६३. पाऊस (हिंदी)
६५. न वापरलेली
६६. इंद्रिय
६७. कंजूष
६९. मागणारा
७०. खून करणे, वध करणे
७३. बिनवासाचे पांढरे फूल
७५. रशिया (हिंदी)
७७. माणूस
७९. स्वप्नरंजनातील पहिला शब्द
८०. सैन्याचा मालपुरवठा
८४. यातनामय जिणे
८५. चार वेदांपैकी एक
८६. यथेच्छ

**उभे शब्द**

१. पौगंडावस्था
२. धांदल, गडबड
३. एक ज्वालाग्रही सुगंधी पदार्थ
४. पानात उजवीकडे वाढले जाणारे पदार्थ, उदा.भाजी, इ.
५. नूतन, ६. सिंह
७. रम्य, ८. नंतर
९. होडी
१०. शिवसेनेतील 'पंत'
११. किल्ल्याभोवतीची भिंत
१४. शेवटचा सूर लांबवून बोलणे
२०. सुकुमार
२१. संधी
२३. जनावरांची कत्तल करणारा
२५. सोन्याचा धागा
२६. नवरा
२६अ. चांगला (अनेकदा उपरोधाने वापरला जाणारा शब्द)
२७. वस्ती
२८. कंड, खुमखुमी
३०. कुटुंब, गोतावळा
३१. छिद्रातून सांडणारे ऊन
३२. धैर्य, धाडस
३४. आशीर्वाद
३५. गप्प बसण्याचे व्रत
३७. मोहक, नशा आणणारे
३९. बारीक झणझण
४०. शोध, माग
४१. चेन्नईचे ब्रिटिशकालीन नाव
४३. परीक्षा घेणे, तपासणे
४४. व्यार्थ जाणारे, निरर्थक
४६. हालचालीवर ठेवलेली नजर
४७. स्वार्थ, हिंदीत अर्थ
४९. सरोज, पंकज
५१. वर्ष
५३. आक्षेप नाही या अर्थी प्रमाणपत्र
५७. पाण्याची जागा, जलाशय
५८. अणकुचीदार
५९. कारण
६०. ज्याप्रमाणे
६१. अनामत, गुंतविलेली रक्कम
६४. सिद्ध
६५. शेळीचे पिल्लू
६६. असाधारण
६८. सापाची एक जात
७१. धोबी
७२. संगीतातील एक राग
७४. उष्ण
७६. एक तारवाद्य
७८. अरण्य
८१. लंकर्णच पण गाढव नाही!
८२. धमकी
८३. पथक, समूह, गट

**शब्दकोडे क्र. ७० चे उत्तर**

आडवे उत्तर : १.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

उभे उत्तर : १.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ

# राष्ट्रीय सेवा योजनेतून ग्राम विकासाला चालना

- डॉ. लक्ष्मण मतकर
- श्री मुलिकादेवी महाविद्यालय निघोजच्या रा. से. यो. विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप




**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

परिश्रम, जिद्द, चिकाटी यामधून आपण घडतो आणी श्रमसंस्कार शिबीराच्या माध्यमातून हेच शिकण्यास मिळते यातूनच राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विकासाला चालना मिळत असल्याचे प्रतिपादन टाकळी ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर यांनी व्यक्त केले आहे. श्री मुलिका देवी महाविद्यालय श्रमसंस्कार शिबिर चिंचोली येथे दि . ६ ते १२ या कालावधीत संपन्न झाले. समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ.मतकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की

राष्ट्रीय सेवा योजनेतून संस्कारक्षम पिढी घडते. याचबरोबर विद्यार्थ्यांचा अंगभूत मूल्यांचा विकास होतो असे प्रतिपादन केले. कुमारी धनश्री कुसकर, कुमारी वैष्णवी सकट, कुमारी पूर्वा भाकरे कु. अभिजीत गोरडे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी छातीठोकपणे पुढे यावे. शिस्त, संस्कार, श्रम, संस्कृती हे सर्व एनएसएस शिकविते. श्रमाची लाज बाळगू नये. जसे पेरावे तसे उगवते. मुलांनी सात दिवस कामे केली हे खरे एनएसएसचे व्यासपीठ आहे. तुम्ही पुढे एम एस सी होताना पण एनएसएस चे प्रमाणपत्र ही महत्त्वाचे आहे. तुम्ही तळपत्या सूर्यासारखे आहे. मळगंगेच्या पावनभूमीत निसर्गरम्य ठिकाण मनाला भावणारे आनंद देणारे आहे. येथे तुम्ही सर्वजण एकत्र जेवण करता तसे घरी नाही. त्याचबरोबर त्यांनी आम्ही कॉलेजला न जाता कॅम्प ला जायचं असे आलेले अनुभवही सांगितले.

डॉक्टर विकास वाळुंज यांनी काम करत असताना आरोग्य जपा. जे तुम्ही द्याल ते परत येईल असा निसर्ग नियमच आहे. आपण जर ठरवले तर युवाशक्ती कोणतेही कार्य करू शकते. सर्व संस्कार शिबिरातून छोट्या मोठ्या गोष्टी घेत जा. हा कॅम्प तुम्हाला खूप मोठी अनुभवाची शिदोरी देईल असे विद्यार्थ्यांना संबोधित केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर म्हटले की, पुस्तके वाचा, श्रमदान करा, महाविद्यालयाचे नाव उज्वल करा. पण हे कॉलेज पुरते मर्यादित न

राहता त्यात वाढ झाली पाहिजे. सामाजिक कार्य करा असे मार्गदर्शन केले.राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर समारोपाचे सूत्रसंचालन प्रा. प्रीती उघडे, प्रा. वृषाली भोसले, प्रास्ताविक प्रा. योगेश कवळे तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.अशोक कवडे यांनी केले.या रा. से. यो. श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी डॉ.मनीषा गाडीलकर, प्रा. सचिन निघूट, प्रा. सुरेश गाडीलकर, प्रा. संदीप लंके, डॉ. गोरक्ष घोलप, प्रा. नीलम वागदरे प्रा. संगीता मांडगे, प्रा. स्वाती मोरे, प्रा. सरडे, प्रा. हर्षदा पंडित, प्रा. अश्विनी ठाणगे प्रा. पुनम गंधाते प्रा. सुप्रिया सालके, प्रा. नीलिमा घुले प्रा. सुनंदा गाडीलकर आदी प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# रांधे सोसायटीच्या अध्यक्षपदी संतोष लामखडे

## उपाध्यक्षपदी संभाजी उर्फ किरण आवारी बिनविरोध निवड

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

रांधे सोसायटीच्या अध्यक्षपदी संतोष लामखडे यांची तसेच उपाध्यक्षपदी संभाजी उर्फ किरण आवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. रांधे विविध कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्ष , उपाध्यक्ष निवडीची संचालक मंडळाची बैठक सचिव खनकर भाऊसाहेब यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली या वेळी या निवडी बिनविरोध करण्यात आल्या. सर्व संचालक मंडळ यावेळी उपस्थित होते. माजी चेअरमन उत्तम गायकवाड सर विनोद फापाळे आबाजी आवारी माजी चेअरमन अमोल आवारी सूचक व अनुमोदक राहिले.यावेळी उत्तम गायकवाड , आबाजी आवारी, अरुण आवारी गुरुजी,दिलीप आवारी गुरुजी संतोष साबळे, विजय सखाराम आवारी, जयश्री आवारी अमोल आवारी बाळासाहेब



साबळे विनोद फापाळे बाळासाहेब आवारी चांगदेव थोरात, शांताराम सरोदे,केरुभाऊ म्हस्कुले , अनिल आवारी, संतोष काटे, सुरेश आप्पा आवारी, महेंद्र आवारी,सुरज आवारी,शरद आवारी, आनंद आवारी राजाराम झिंजाड, भुषण आवारी,सतिश लामखडे गजनान मोरे संपत लामखडे गोकुळ आवारी, अमोल शिंदे,शाकिर तांबोळी, महादेव आवारी कैलास आवारी सुरेश थोरात, अथर्व आवारी, अमोल शेंडकर, युवराज झिंजाड उपस्थित होते. नूतन बिनविरोध निवडीतून फक्त सत्ता मिळाली नसून सर्व संचालक मंडळींनी एक विशेष जबाबदारी खांद्यावर दिली असून त्या जबाबदारी ला तितक्याच कुशल पद्धतीने पूर्ण करण्यासाठी आम्ही असल्याचे नूतन चेअरमन संतोष लामखडे तर व्हा चेअरमन संभाजी आवारी यांनी सांगितले.

# २० प्रभागासाठी जवळपास ५५ ते ६० टक्के मतदान

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या २० प्रभागातील ८१ विविध राजकीय पक्षाचे व अपक्ष उमेदवारांसाठी दि. १५ जानेवारी रोजी मतदान पार पडले तर यात दुपारी साडे तीन वाजेपर्यंत ४१.६५ टक्के मतदान झाले होते तर अनेक ठिकाणी दुपारी ४ ३० नंतर जास्ती जास्त मतदारांनी घराच्या बाहेर पडून मतदान केंद्रावर रांगा लावून मतदान केले त्या मुळे नांदेड महानगर पालीकेचा मतदान जवळपास ५५% ते ६० % पर्यंत होण्याची शक्यता आहे . किरकोळ प्रकार वगळता सायंकाळपर्यंत महापालिका प्रशासन व पोलीस प्रशासनाच्या चोख बंदोबस्तात मतदान प्रक्रिया सुरळीत होती. शहरातील काही मतदान केंद्रांवर मतदरांच्या रांगा होत्या. तर काही केंद्रावर तुरळक मतदार दिसून आले. दि. १६ जानेवारी रोजी पॉलिटेक्निकल कॉलेज येथील मतमोजणी होऊन निकाल घोषीत होणार आहे.

तब्बल ७ वर्षानंतर नांदेड वाघाळा महानगरपालिकेची निवडणूक घेण्यात येत आहे. या निवडणुकीत २० प्रभागातील ८१ उमेदवार निवडून येण्यासाठी रिंगणात आहेत. त्याकरिता तब्बल ४९१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. प्रभाग क्रमांक १ ते १९ मध्ये ४ उमेदवार आहेत तर प्रभाग क्रमांक २० मध्ये ५ उमेदवार निवडून द्यावयाचे आहेत. नांदेड वासीयांनी प्रशासक मुक्त होणार या भावनेने उत्साहीत झाले होते. भावी नगरसेवक तर गुडघ्याला बाशिंग बांधून होतेच. त्यामुळे महापालिका निवडणूक घोषित होताच सर्व राजकीय पक्ष भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट) काँग्रेस, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी (शरद पवार), वंचित बहुजन आघाडी, एमआयएम,शहर विकास आघाडी आदी निवडणुकीच्या तयारीला लागले होते. नांदेड जिल्ह्यातील नगरपालिका व नगरपंचायती मधील काही नगरपालिका वाडार्ची निवडणूक निवडणूक आयोगाने पुढे ढकलली. त्यामुळे महापालिकेची निवडणूक दहा ते पंधरा दिवसांनी पुढे ढकलली गेली. त्यानंतर निवडणुकीची प्रक्रिया सुरू होताच महायुती व महाविकास आघाडी व इतर पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले. काँग्रेस - वंचित बहुजन आघाडी यांची तर शिवसेना (शिंदे गट) - राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांची दक्षिण नांदेडात युती वगळता सर्वच पक्ष स्वबळावर निवडणुकीत उभे टाकले.

शहरातील दक्षिण व उत्तर भागातील मिळून ५ लाख १ हजार ७९९ मतदार या निवडणुकीत आपला हक्क बजावणार होते.

# दोषींवर कारवाई करा

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

कोलतावडे ता.आंबेगाव या गावातील शेळके या आडनावाच्या नाम साधर्म्याचा फायदा घेऊन मुळशी तालुक्यातील शेळके नामक इसमाने बनावट कागदपत्रे मंचर प्रांत कार्यालयास सादर करून कोळी महादेव जमात प्रमाणपत्र मिळवून त्या आधारे जात वैधता प्रमाणपत्र मिळवले आहे. या प्रकाराची चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी. या मागणीचे निवेदन मंचर प्रांतअधिकारी गोविंद शिंदे यांना कोलतावडे ग्रामस्थांनी दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की शेळके नावाच्या नाम साधर्म्य असणाऱ्या याबाबत माहिती समोर येताच कोलतावडे ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रामसभा आयोजित करून सदर विषयावर सविस्तर विचार मंथन केले. ग्रामसभेत झालेल्या चर्चा व खुलाशा नुसार ज्ञानेश्वर बबन शेळके हा इसम कोलतावडे गावचा नसल्याचे स्पष्ट झाले.

# रिल्स बनविण्यात वेळ घालण्यापेक्षा अभ्यासाला वेळ द्या - राजेंद्र भालेराव



### लाखोंचे शैक्षणिक साहित्य

श्री राजेंद्र दशरथ भालेराव यांनी ढवळपुरी केंद्राप्रमाणेच हिवरे कोरडा, तुफान वस्ती व आश्रम शाळा येथील विद्यार्थ्यांना जवळपास १००० स्कूल बॅग त्याचप्रमाणे वह्या, कंपास पेटी, चित्रकला वही, आलेख वही, पाटी-पेन्सिल, अंकलिपी आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. ढवळपुरी परिसरात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या संख्येने शालेय साहित्याची विद्यार्थ्यांना कोणीतरी मदत केली आहे.

**(समर्थ गांवकरी)**

तरुण पिढीने रिल्स बनविण्यात आपला वेळ वाया घालविण्यापेक्षा जर अभ्यासासाठी वेळ दिला तर त्याचा नक्कीच फायदा होईल असे प्रतिपादन स्कॉशा बँकेचे मुख्य सुचना सूरक्षा अधिकारी राजेंद्र दशरथ भालेराव यांनी ढवळपुरी येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप प्रसंगी केले. यावेळी त्यांचे बंधू चंद्रकांत भालेराव, सुरेशशेठ रोहकले, संभाजी अडसूळ, ॲड. रत्नाकर मधाळे, सलीम शेख, पत्रकार संतोष कोरडे, अशोक कोटयान, लहानु भालेराव, रोहिदास भालेराव, कविवर्य रामदास भालेराव, आकाश भालेराव तसेच सुदाम कोरडे, मुख्याध्यापक संदीप महांडुळे, बापूसाहेब रूपनर आदी उपस्थित होते.

सोशल मीडिया तंत्रज्ञानातील व बँकिंग क्षेत्रातील ऑनलाईन तंत्रज्ञानातील अभ्यासक व मार्गदर्शक राजेंद्र दशरथ भालेराव यांनी आपले वडील स्व दशरथ भालेराव, आई स्व शकुंतला भालेराव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ ढवळपुरी केंद्रातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, आश्रमशाळा, हिवरे कोरडा, तुफान वस्ती आदी ठिकाणच्या विद्यार्थ्यांना

मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना राजेंद्र भालेराव म्हणाले की, आज आम्ही ज्या पदावर आहोत त्यासाठी आमच्या आई-वडिलांनी त्यावेळी खूप मेहनत घेतली. त्या काळात आम्हाला ज्या शैक्षणिक साहित्याची आवश्यकता असायची त्यापासून वंचित राहावं लागलं. आजच्या काळातील गरीब व गरजू विद्यार्थी शैक्षणिक साहित्यापासून वंचित राहू नये. यासाठी आम्ही फुल ना फुलाची पाकळी म्हणून ढवळपुरी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व इतर शैक्षणिक सुविधांसाठी नेहमी मदत करत असतो.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संदिप महांडुळे यांनी केले तर सूत्रसंचालन शिक्षक राजाराम वाघ यांनी केले तर आभार मुख्याध्यापक बापूसाहेब रुपनर यांनी मानले.

# हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग येथे दीपप्रज्वलन व शपथविधी सोहळा!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील अकोले शहरातील हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन, ट्रायबल डेव्हलपमेंट अँड रिसर्च सेंटर अंतर्गत हरिश्चंद्र मेडिकल फाउंडेशन कॉलेज ऑफ नर्सिंग अँड रिसर्च सेंटर, अकोले येथे दीपप्रज्वलन व शपथविधी समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, १६ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता महाविद्यालयाच्या कॅम्पस परिसरात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. किरण लहामटे, आमदार अकोले विधानसभा मतदारसंघ, महाराष्ट्र राज्य हे उपस्थित राहणार आहेत. सन्माननीय पाहुणे म्हणून डॉ. विश्वासराव आरोटे, राज्य सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य



पत्रकार संघ, मुंबई तसेच अरुण शेळके, माजी सदस्य, पंचायत समिती अकोले हे लाभणार आहेत.

या सोहळ्यात नर्सिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा शपथविधी पार पडणार असून दीपप्रज्वलनाद्वारे नर्सिंग सेवेतील त्याग, सेवा व मानवतेचे महत्व अधोरेखित केले जाणार आहे.

यावेळी डॉ. ज्योती एम. भांडकोळी, डॉ. वैशाली आर. हिले (वैद्यकीय अधिकारी, एमपीकेव्ही, राहुरी, जि. अहिल्यानगर), प्रा. कविता व्ही. माने, डॉ. मारुती के. भांडकोळी, डॉ. राजेंद्र बी. हिले (कृषी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राहुरी, जि. अहिल्यानगर) तसेच प्रा. कीर्ती व्ही. गंधाळे, उपप्राचार्य, एचएमएफ कॉलेज, अकोले यांची उपस्थिती राहणार आहे.

“Caring is the essence of nursing” या ब्रीदवाक्यानुसार विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, कर्तव्यनिष्ठा व व्यावसायिक मूल्यांची जाणीव निर्माण करण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे आहे. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राज्यात दुसरी क्रमांकाची झेप

**मंचर : (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर गावची शेतकरी कुटुंबातील सुकन्या कु.शितल रंगनाथ शिंदे हिने वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथून मास्टर ऑफ डॉक्टरेट (एम डी ) पदवी मिळवली आहे. त्याबद्दल निरगुडसर ग्रामस्थांच्या वतीने तिचा सन्मान करण्यात आला. मास्टर ऑफ डॉक्टरेट परीक्षेत कु. शितल रंगनाथ शिंदे हिने राज्यात दुसरा क्रमांक पटकावत आपल्या कर्तृत्वाची ठळक छाप उमटवली आहे. आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही शिक्षणाच्या प्रवासात तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला.मात्र जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर तिने सर्व अडथळ्यांवर मात करत हे यश मिळवले.

# फर्स्ट-एव्हर कोक स्टुडिओ भारत लाइव्हचे पदार्पण

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

कोका-कोलाने फर्स्ट-एव्हर कोक स्टुडिओ भारत लाइव्हच्या लॉंचसह भारतातील सांस्कृतिक प्रवासामध्ये मोठा टप्पा गाठला, जेथे आपल्या सुप्रसिद्ध म्युझिक प्लॅटफॉर्मला पहिल्यांदाच स्क्रिनवरून मंचापर्यंत आणले. कोक स्टुडिओ भारतचे मोठ्या प्रमाणात लाइव्ह विस्तारीकरण म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या या उपक्रमामध्ये आर्टिस्ट्स, प्रेक्षक व समुदाय एकत्र आले, जेथे त्यांनी एकत्रित संस्मरणीय क्षणांच्या माध्यमातून भारताच्या वैविध्यपूर्ण संगीत वारशाला साजरे केले. कोक स्टुडिओ भारत लाइव्हचे पदार्पणीय पर्व 10 जानेवारी रोजी दिल्लीमध्ये आणि 13 जानेवारी रोजी गुवाहाटीमध्ये सुरू झाले. या दोन्ही दिवशी प्लॅटफॉर्मच्या तत्त्वाचे विशिष्ट पैलू पाहायला मिळाले, जे प्रादेशिक कलेमध्ये सामावलेले असण्यासोबत देशभरातील प्रेक्षकांशी संलग्न




आहेत. कोका-कोला इंडिया आणि साऊथवेस्ट एशियाचे आयएमएक्स (इंटीग्रेटेड मार्केटिंग एक्स्पीरिअन्स) प्रमुख शंतनू गंगाणे म्हणाले, कोक स्टुडिओ भारत लाइव्ह स्क्रिनवरून मंचापर्यंत येण्याच्या दिशेने प्लॅटफॉर्मचे पहिले पाऊल ठरले आहे. लाइव्ह परफॉर्मन्समध्ये संगीतासोबत फूडचा आस्वाद आणि क्रीडाचा आनंद मिळाला. दिल्ली व गुवाहाटीमध्ये ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि शो पाहण्यासोबत संस्मरणीय क्षण निर्माण केले. आर्टिस्टसोबत सहयोग आणि रीलीज न झालेल्या गाण्यांच्या प्रीव्ह्यूपासून मंचावर आर्टिस्ट्ससोबत चाहते सामील होण्यापर्यंत या दोन दिवसांमध्ये अद्वितीय संबंध निर्माण झाले. दोन्ही शहरांमधून मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामधून दिसून आले की, सहयोगाने अनुभव दिल्यास कोक स्टुडिओ भारत चाहत्यांशी अधिक संलग्न होत राहिल. नवी दिल्लीमध्ये लाइव्ह प्रवासाला सुरूवात झाली, एनएसआयसी ग्राऊंड्स, ओखला येथे लाइव्ह परफॉर्मन्सचे आयोजन करण्यात आले.

# समाजातील परंपरा व संस्कृती यांचा सुंदर संगम घडवतो

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

झी टीव्हीवरील नवीन मालिका ‘गंगा माई की बेटियाँ’ने प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. या कथेत गंगामाई नावाच्या स्त्रीची गोष्ट दाखवली आहे, जिचा नवरा तिला मुलगा न झाल्यामुळे सोडून जातो, पण ती हार न मानता स्वतःचा सन्मान टिकवते आणि आपल्या तीन मुली — सहाना (सृष्टी जैन), स्नेहा (अमनदीप सिद्धू) आणि सोनी (वैष्णवी प्रजापती)यांना वाराणसीच्या घाटांच्यापार्श्वभूमीवर वाढवते.या शांत पण ताकदवान आईची भूमिका अनुभवी अभिनेत्री शुभांगी लाटकर साकारत आहेत. तब्बल सहा वर्षांनंतर त्या झी टीव्हीवर परतल्या आहेत.



गंगा माई की बेटियाँ’ही केवळ एक कथा सांगणारी मालिका नाही, तर माझ्या मते ती आपल्या आयुष्याचेच प्रतिबिंब आहे. जिद्द, सन्मान आणि कौटुंबिक नाती या फक्त कल्पना नाहीत. हे आपण रोज आपल्या आजूबाजूला पाहतो. आपल्या जवळच्या लोकांशी असलेले आपले प्रेम आणि नाते आपल्याला स्वप्ने पाहायला, लढायला आणि कधीही हार न मानायला बळ देतात. सहा वर्षांनंतर झी टीव्हीवर परत येणे म्हणजे खरंच घरी परतल्यासारखे वाटतआहेआणि या पुनरागमनासाठीगंगा माईसारखी भूमिका मिळणे माझ्यासाठी खूप खास आहे. मला या भूमिकेने सर्वांत जास्त आकर्षित केले.

# राहुरी व्यापारी असोसिएशनतर्फे नवनिर्वाचित नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षांचा जंगी सत्कार

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

राहुरी नगरपालिकेच्या नूतन निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांचा गौरव आणि शहराच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी राहुरी व्यापारी असोसिएशनच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष श्री. भाऊसाहेब मोरे व उपनगराध्यक्ष श्री. गजानन सातभाई यांचा असोसिएशनच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राहुरी व्यापारी असोसिएशनचे प्रकाश पारख यांनी नूतन नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष तसेच सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचे



अभिनंदन केले. राहुरी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापारी वर्ग पालिकेच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. व्यापाऱ्यांनी मांडल्या प्रमुख मागण्या आणि समस्या:

या सत्कार समारंभाचे औचित्य साधून व्यापारी असोसिएशनने शहराच्या प्रलंबित समस्यांकडे नूतन पदाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. यामध्ये प्रामुख्याने खालील मागण्या मांडण्यात आल्या: अश्वारूढ पुतळा: अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा पूर्व नियोजित जुन्या पाण्याच्या टाकीच्या जागेतच लवकरात लवकर उभारण्यात यावा.बाजारपेठेतील कचरा वेळेवर उचलण्यासाठी स्वतंत्र घंटागाडी उपलब्ध करून द्यावी. शहरातील वाढती वाहतूक कोंडी पाहता पार्किंगसाठी 'सम-विषम' (P1-P2) तारखांची अंमलबजावणी करावी.बाजारपेठेतील रस्ते तातडीने खड्डेमुक्त करावेत, शहरात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत आणि महामार्गावर पांढरे पट्टे (झेंब्रा क्रॉसिंग) आखण्यात यावेत.गुरुवारच्या आठवडे बाजाराचे योग्य नियोजन करावे. तसेच अग्निशमन दल, रुग्णालय परिसरात बसणाऱ्या व्यावसायिकांना पर्यायी जागा उपलब्ध करून देऊन त्या परिसरातील अडथळा दूर करावा.शहराचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी फ्लेक्स बोर्ड लावण्याबाबत कडक नियमावली तयार करावी. या प्रसंगी नंदूशेठ भट्टड, विलास तरवडे, बाळासाहेब उंडे, सूर्यकांत भुजाडी, अनिल कासार, संजीव उदावंत, ॲड. संतोष आळंदे, गणेश नेहे, लक्ष्मीकांत तनपुरे, संतोष लोढा, नवनीत दरक, एकनाथ खेडेकर, अनिल भट्टड, प्रवीण ठोकळे, महादेव बिडवे, मच्छिंद्र गुलदगड, आबा शेटे, सचिन जाधव, सुनील देशपांडे यांसह राहुरीतील मोठ्या संख्येने व्यापारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार देवेन्द्र लांबे यांनी मानले. नवनिर्वाचित नगरध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी सर्व समस्या प्राधान्याने सोडवण्याचे आश्वासन व्यापाऱ्यांना दिले आहे.

# ह्युंदाई मोटर इंडिया फाऊंडेशनने शहरी वन केले निर्माण

पुणे : (समर्थ गांवकरी)

ह्युंदाई मोटर इंडिया फाऊंडेशन (एचएमआयएफ) या ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल) च्या सीएसआर शाखेने उल्लेखनीय टप्पा संपादित केला आहे, जेथे पुण्यातील तळेगावजवळ आयओएनआयक्यू फॉरेस्ट उपक्रमांतर्गत 1 दशलक्ष झाडांचे यशस्वीरित्या वृक्षारोपण केले. या उपक्रमांतर्गत 90.5 एकर जागेवर मियावाकी पद्धतीचा वापर करत 41 स्थानिक वृक्ष प्रजातींची लागवड करण्यात आली. हा उपक्रम देशामध्ये हाती घेण्यात आलेला सर्वात प्रभावी, एकाच ठिकाणी आणि ठराविक वेळेमध्ये करण्यात आलेला वनीकरण प्रयत्न आहे. मे 2025 मध्ये जागा पाहणीसह या उपक्रमाची सुरूवात झाली, ज्यानंतर जागतिक पर्यावरण दिनी (5 जून 2025) वृक्षारोपण मोहिम सुरू झाली. यानंतर सप्टेंबर



2025 मध्ये महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते अधिकृतरित्या उद्घटन करण्यात आले. प्रत्येक झाडावर क्यूआर कोडसह जिओ टॅग लावण्यात आला आहे, ज्यामधून पादर्शकतेची खात्री मिळण्यासोबत झाडांची उत्तम देखभाल करता येते. या उपक्रमांचे महत्त्व सांगत एचएमआयएलच्या कॉर्पोरेट अफेअर्स, कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स अँड सोशलचे एव्हीपी व व्हर्टिकल हेड श्री. पुनीत आनंद म्हणाले, ह्युंदाई मोटर इंडिया फाऊंडेशनचा आयओएनआयक्यू फॉरेस्ट प्रकल्प वनीकरण प्रयत्नापेक्षा अधिक आहे. या प्रकल्पामधून हरित व अधिक शाश्वत भविष्य निर्माण करण्याप्रती आमचा दृष्टिकोन दिसून येतो. पर्यावरण संवर्धन व समुदायांच्या सक्षमीकरणाला एकत्र करत ह्युंदाई भारतात शाश्वत विकासासाठी मापदंड स्थापित करत आहे. या उपलब्धीला अधिक महत्त्वपूर्ण बनवणारी बाब म्हणजे एकाच ठिकाणी एका वर्षाच्या आत 1 दशलक्ष झाडे लावण्यात आली आहेत. यासह ह्युंदाई महाराष्ट्रात आपली उपस्थिती वाढवत असताना पर्यावरणीय स्थिरता, हवामान कृती आणि जबाबदार विकासाप्रती कटिबद्धता अधिक दृढ झाली आहे. पर्यावरणीय प्रभावाव्यतिरिक्त हा उपक्रम समुदायांना सक्षम करतो, जेथे स्थानिक आदिवासी समुदायामधील 150 हून अधिक सदस्यांसाठी शाश्वत उदरनिर्वाह निर्माण केला आहे, सामाजिक सर्वसमावेशनासह पर्यावरणीय संवर्धनाला प्राधान्य देत आहे. पुढील पाच वर्षांमध्ये या वनातील झाडे 63,000 टन कार्बन डायऑक्साइड शोषून घेण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे जैवविविधता वाढेल आणि हवामान स्थिरता प्रबळ होईल. पूर्णपणे विकसित झाल्यानंतर हे वन शाळा व स्थानिक समुदायांसाठी गतीशील शैक्षणिक केंद्र म्हणून सेवा देईल, जेथे पर्यावरणाबाबत जागरूकतेला चालना देण्यात येईल आणि भावी पिढ्यांमध्ये शाश्वततेची संस्कृती रूजवण्यात येईल.

# प्रियमवदा कांत यांच्यासाठी नवीन वर्षाचा पहिला दिवस अधिक खास आहे

पुणे : (समर्थ गांवकरी)

एण्ड टीव्हीवरील मालिका घरवाली पेडवालीमध्ये मोहक व जादुई लतिकाची भूमिका साकारणाऱ्या प्रियमवदा कांत यांच्यासाठी 1 जानेवारी हा दिवस अत्यंत खास आहे, नवीन वर्षाची सुरूवात होण्यासह त्यांचा वाढदिवस देखील असतो. नवीन वर्ष 2026 मध्ये पदार्पण करत असताना अभिनेत्री गेल्या वर्षातील घडामोडींना उजाळा देत आहेत, मनोरंजनसृष्टीमधील 15 वर्षांना साजरे करत आहेत आणि उत्साह, कृतज्ञता व नवीन ऊर्जेसह पुढे वाटचाल करण्यास सज्ज आहेत. व्यस्त शूटिंग वेळापत्रक असताना देखील उत्साहात काम करणाऱ्या प्रियमवदा यांचा विश्वास आहे की प्रेम, आनंद आणि जादुई भूमिकेसह नवीन वर्षाची सुरूवात



करण्यासारखा अधिक अर्थपूर्ण मार्ग नसावा. प्रियमवदा कांत ऊर्फ लतिका म्हणाल्या, 1 जानेवारीला माझा वाढदिवस असल्याने हा दिवस माझ्यासाठी खूप खास आहे. शाळेमध्ये असताना प्रत्येकजण नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी उत्सुक असायचे, पण मी यासोबत माझा वाढदिवस साजरा करण्यासाठी अधिक उत्साही असायचे. बहुतेकजण वर्षभर आपला वाढदिवस साजरा करण्याची वाट पाहत असतात, पण मी वर्ष संपण्याची वाट पाहत असते, कारण माझ्यासाठी ते नवीन शुभारंभासारखे आहे. खरंच डबल गिफ्ट मिळाल्यासारखे वाटते आणि वर्षातील पहिल्याच दिवशी माझा जन्म झाल्यामुळे मी स्वत:ला खूप भाग्यवान मानते.

वाढदिवसानंतरच्या साजरीकरणाबाबत सांगताना प्रियमवदा म्हणाल्या, यंदा मी साधेपणाने, पण विशेष पद्धतीने माझा वाढदिवस साजरा केला. मी मालिका घरवाली पेडवालीसाठी शूटिंग करत होते, पण स्वत:साठी काही वेळ काढण्याची खात्री घेतली. मी माझी लहान मांजर शहनशाहसोबत सायंकाळ व्यतित केली.

# पारनेरच्या विकासाला राजकीय खीळ

## दहा कोटींचा निधी अडवल्याचा नगरसेवक अशोक चेडेंचा आरोप!




पारनेर : (समर्थ गांवकरी)

गुरुवार दि. १५ जानेवारी २०२६ पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी नागरिकांच्या मागणीनुसार शासन स्तरावर सातत्यपूर्ण पाठपुरावा करत तब्बल दहा कोटी रुपयांचा विकासनिधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र या निधीतून होणाऱ्या विकासकामांनाच पारनेर नगरपंचायतीतील सत्ताधारी गटाकडून जाणीवपूर्वक आडवणूक केली जात असल्याचा गंभीर आरोप विरोधी नगरसेवक अशोक चेडे यांनी केला आहे.

नगराध्यक्षा सौ. विद्या कावरे यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी गटाने राजकीय द्वेषापोटी जनतेच्या विकासाला खीळ घातली असून, आमदार काशिनाथ दाते सर यांनी आणलेल्या निधीच्या कामांना मंजुरी देण्यासाठी आवश्यक ठराव जाणूनबुजून लांबवले जात असल्याचे चेडे यांनी स्पष्ट केले. यासंदर्भात अशोक चेडे यांच्यासह माजी नगराध्यक्ष विजय औटी, निता ठुबे, पै. युवराज पठारे, नवनाथ सोबले व शालूबाई ठाणगे या सहा नगरसेवकांनी थेट जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, नगरपंचायतीच्या पायाभूत सुविधांसाठी मंजूर असलेला दहा कोटींचा निधी वापरण्यासाठी वारंवार लेखी व तोंडी मागणी करूनही सत्ताधारी गटाकडून दुर्लक्ष केले जात आहे. विशेषतः गावातील मुख्य बाजारपेठेतील अत्यावश्यक रस्त्यासाठी मंजूर असलेले ३० लक्ष रुपयांचे काम केवळ राजकीय आकसातून रोखले जात असून, त्यामुळे व्यापारी व नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. सत्ताधारी नगरसेवक मात्र त्यांच्या वार्डातील कामे सुरू ठेवत असून, आमदार दाते सर यांच्या माध्यमातून आलेल्या निधीच्या कामांनाच जाणीवपूर्वक व राजकीय आकसातून अडथळे आणले जात असल्याचा निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर नुतन नगराध्यक्षा डॉ. विद्या कावरे यांनी जनहित लक्षात घेऊन कामे मार्गी लावण्याऐवजी गटातटाच्या राजकारणालाच खतपाणी घातल्याचा आरोप करण्यात येत आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून 'उलटा चोर कोतवाल को डाटे' अशी भूमिका घेत त्यांनी दिलेल्या प्रतिक्रियेत गेली तीन वर्षे रखडलेली पारनेरची पाणी योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठीचे दोन कोटी रुपये, नगरपंचायत प्रशासकीय इमारत, फायर स्टेशन तसेच साडेचार कोटींचे उद्यान आदी कामे पालकमंत्री व आमदारांनीच अडवली असल्याचे निराधार आरोप केल्याचे नगरसेवकांचे म्हणणे आहे.

यावर अशोक चेडे व इतर नगरसेवकांनी थेट सवाल उपस्थित केला आहे की, "जर आमदार काशिनाथ दाते सर यांनाच ही कामे अडवायची असती, तर आमदार महोदयांनी गेल्या एक ते दीड वर्षांच्या कालावधीत पारनेर शहरासाठी अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रविकास २५-२६ अंतर्गत १ कोटी, जिल्हा वार्षिक योजना २५-२६ अंतर्गत बुगेवाडी येथील शाळा खोलीसाठी १२ लक्ष, नगर पंचायत क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेच्या कामांसाठी ६ कोटी, नगर पंचायत क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे २५-२६ अंतर्गत ५ कोटी, विशेष रस्ता अनुदान २५-२६ अंतर्गत ४.०८ कोटी, वैशिष्ट्यपुर्ण योजना २५-२६ अंतर्गत ९२ लक्ष, स्थानिक विकास कार्यक्रम २४-२५ अंतर्गत ४० लक्ष, स्थानिक विकास कार्यक्रम २५-२६ अंतर्गत १९ लक्ष तर नमो उद्यानासाठी १ कोटी असा एकुण १८.७१ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला असता काय? तसेच पारनेरच्या पाणी योजनेसाठी नागपूर येथे झालेल्या अधिवेशनात त्यांनी ठामपणे आवाज उठविला असता काय?"

# तळागाळातील एआय नवप्रयोग सादर

पुणे : (समर्थ गांवकरी)

पुण्यातील डीवाय पाटील विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या ओपनआय अकॅडमी × नेक्स्टवेव्ह बिल्डथॉनमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील १,००० पेक्षा अधिक विद्यार्थी एकत्र आले. त्यातून भारतातील उगवत्या एआय प्रतिभेची गहनता समोर आली. या ४८ तासांच्या जेनआय एआय स्पर्धेत ३५० पेक्षा अधिक विद्यार्थी संघांनी भाग घेतला, शहरात आयोजित करण्यात आलेल्या सर्वात मोठ्या प्रादेशिक एआय बिल्डथॉनपैकी हा एक ठरला. संजय घोडावत युनिव्हर्सिटी, वासीरेड्डी वेंकटैय्या इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, एनआयएटी, एडीवायपीयू इत्यादी संस्थांमधील प्रथम वर्ष अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी या ४८ तासांच्या बिल्डथॉनमध्ये भाग घेतला, त्यातून भारताच्या पुढील पिढीमध्ये एआय प्रतिभेच्या तत्परतेनं स्वीकार अधोरेखित झाला. ओपनआय अकॅडमी × नेक्स्टवेव्ह बिल्डथॉन हा जानेवारीत होणाऱ्या इंडिया-एआय इम्पॅक्ट २०२६ याच्याशी संलग्न प्री-समिट कार्यक्रम आहे. ही समिट इंडियाएआय मिशन अंतर्गत भारत सरकारच्या वतीने आयोजित प्रमुख जागतिक एकत्रीकरण आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये भारताच्या नेतृत्वाचा वेग वाढविणे हे त्याचे लक्ष्य आहे. इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या इंडियाएआय उपक्रमाच्या अनुषंगाने या बिल्डथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. आरोग्यसेवा, शिक्षण, शेती, व्यवसाय आणि सार्वजनिक सुरक्षा या क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या परिवर्तनकारी क्षमतेचा शोध घेण्यासाठी तरुण प्रयोगकर्त्यांना सक्षम करणे हे त्याचे लक्ष्य आहे.

# कात्रजमध्ये श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन

## माय माऊली केअर सेंटरच्या वतीने विशेष आध्यात्मिक सोहळा

कात्रज पुणे : (समर्थ गांवकरी)

कात्रज येथील माय माऊली केअर सेंटर च्या माध्यमातून या अध्यात्मिक सोहळ्याचे आयोजन केले असून या भव्य दिव्य अशा श्रीमद् भागवत सप्ताह चे 14 जानेवारी मकर संक्रांतीच्या विशेष मुहूर्तावरती दुपारी तीन वाजता या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील महान दानशूर व्यक्तिमत्व कार्यक्रमाचे आधारस्तंभ श्री.शेठ नानजीभाई ठक्कर (ठाणावाला), आयोजक, भाविकभक्त आणि नागरिकांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी म्हणून कथा प्रवक्ते शास्त्रीजी जीदन्येश जयेशभाई जोषी यांच्या रसाळ वाणीतून या सुंदर अशा कथेचे निरुपण करण्यात येत आहे. याप्रसंगी परिसरातील मोठ्या संख्येने भाविकभक्त महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील नागरिक उपस्थित होते, मंत्रमुग्ध होणारे अशा या शास्त्री यांच्या रसाळ वाणीतून अध्यात्माचा आणि प्रवचनाचा अनेक लोक लाभ घेत आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजक माय माऊली सेंटरचे संस्थापक, अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी केली आहे. याप्रसंगी त्यांनी परिसरातील नागरिकांना आव्हान केले की हा 14 जानेवारी ते 20 जानेवारी 2026 या कालावधीत दररोज दुपारी तीन ते सहा या दरम्यान होणार आहे, या दरम्यान प्रवचन महाआरती व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी या सोहळ्यातील भक्तीरसाचा आस्वाद सहकुटुंब सहपरिवार सर्वांनी मिळून उपस्थित राहत आस्वाद घ्यायचा आहे. असे






आवाहन करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री विकासजी मुंदडा, विशाल वरुडे पाटील, शांतीलालजी बाफना, हेमलता जैन यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.

कथाकार शास्त्री यांनी आपल्या प्रवचनाच्या माध्यमातून विविध अध्यात्मिक विषयावर सखोल मार्गदर्शन होणार असून. सुदामा चरित्र या कथेने कार्यक्रमाचे सांगता होणार आहे. सामाजिक अध्यात्मिक विचारांचा सुरेखाचा मेळ घालत वर्तमान काळात अशा प्रवचनांची गरज असल्याचे त्यांनी आवर्जून सर्वापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी सुनीलभाऊ रासने, डॉ. विश्वासराव आरोटे, ह भ प विष्णू महाराज केंद्रे,

मगरराजजी राठी, राजेश अग्रवाल, बाळासाहेब धोका, तानाजी लामखंडे, जयंत घोरपडे, कांतीराम बोऱ्हाडे, कृष्णाजी शेलार, शोभा सोलंकी यासह अनेक दिग्गज मान्यवर मंडळी या प्रवचन सेवेचा लाभ घेत आहेत.

या दरम्यान कार्यक्रमाचे संयोजन पद स्वीकारण्याची उत्तम सुवर्णसंधी लाभ मिळणार असून ज्या भावी भक्तांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी 9222012707 या क्रमांकावर ती संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे

# मतदारांनी ठरवले, मराठवाडा कोणाचा

(समर्थ गांवकरी)

## डॉ. अभयकुमार दांडगे, मराठवाडा वार्तापत्र नांदेड

मराठवाड्यातील पाच महानगरपालिकांसाठी एकदाचे मतदान पार पडले. शुक्रवारीच मतमोजणी असून सायंकाळपर्यंत मराठवाड्यातील मतदारांनी कोणाला पसंती दिली हे समोर येणार आहे. मराठवाड्यातील पाचही महानगरपालिकांसाठी अपेक्षेपेक्षा कमीच मतदान झाले. ज्येष्ठ नागरिकांसह नवख्या तरुण मतदारांनी मात्र यंदा स्वंयस्फूर्तीने मतदान केले. एकंदरीत मराठवाड्यातील प्रगतीचा आलेख लक्षात घेता मराठवाडा हा भाजपाचा राहील, तसेच सर्वाधिक नगरसेवक हे भाजपाचेच असतील असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी मतदानाच्या दिवशी लावला. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी मतदानाच्या दिवशी चांगलीच चुरस दिसून आली. त्यापाठोपाठ नांदेड व लातूरची महानगरपालिका लक्षवेधी ठरणार आहे. जालना येथे महानगरपालिकेसाठी पहिल्यांदाच मतदान पार पडले. जालन्यात मात्र मतदारांचा उत्साह दिसून आला. मराठवाड्यात काही किरकोळ प्रकार वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले. मतदानाची टक्केवारी अपेक्षेपेक्षा कमी असली तरी विजयाचा जल्लोष मात्र मराठवाड्यात मोठा राहणार आहे.

राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये १५ जानेवारी रोजी मतदान पार पडले. निवडणूकीत मते मिळविण्यासाठी जवळपास सर्वच पक्षांनी जीव ओतून प्रचार केला व विजयासाठी दिवस-रात्र मेहनत घेतली. मराठवाड्यात अनेक पुढाऱ्यांनी निष्ठा वेशीवर टांगून विविध प्रकारची आश्वासने मतदारांना दिली आहेत. तरी देखील मतदारांचा उत्साह मराठवाड्यात अपेक्षित टक्केवारीपेक्षा कमीच दिसून आला . आश्वासने देऊन पूर्ण करणारा एकही पक्ष नाही, अशी प्रतिक्रिया अनेक मतदारांनी उघड उघड दिली. परंतु भाजपकडून आश्वासने पाळली जातील , असा मतदारांचा कयास आहे. केंद्र व राज्यातील सत्ताधाऱ्यांचे गणित लक्षात न घेणारे मतदार भूलथापांना बळी पडतात. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, वंचित आघाडी, एम.आय. एम. यासह इतर पक्षातर्फे जाहिरनामा प्रकाशित करतांना आश्वासनांचा बाजार त्यामधून मांडला गेला. मते मिळविण्यासाठी राजकीय पुढाऱ्यांना काही तरी आश्वासन द्यावेच लागते. यंदाची निवडणूक ही राज्यात यावेळी एका वेगळ्या स्वरुपात आलेली होती. पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या म्हणजेच 29 महानगरपालिकांसाठी एकाच दिवशी मतदान पार पडले. त्यामुळे पक्षांची व पक्षप्रमुखांची आश्वासने देतांना तसेच प्रचार सभा घेण्यासाठी तारांबळ उडाली. मराठवाड्यात ज्या-ज्या ठिकाणी महानगरपालिकांसाठी मतदान झाले , त्या-त्या ठिकाणी पक्षातर्फे विविध प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले गेले. जी आश्वासने दिली जात आहेत, त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले तर हे सर्व प्रश्न आजपर्यंत कोणताही पक्ष का सोडवू शकला नाही,असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. मतदानाच्या दिवशी अनेक मतदार हाच प्रश्न एकमेकांना उपस्थित करत होते.सत्तेवर असणारे कधीतरी विरोधी पक्षात होते व जे विरोधी पक्षात आहेत, ते कधीतरी सत्तेवर होतेच. मग हे दोन्ही पक्षांचे नेते व पक्ष केवळ मतदारांना गुलाबी आश्वासनेच देऊन मते मिळवित स्वतःची पोळी भाजून घेत होते का ? आज जो सत्तेवर आहे, त्यांनी यापूर्वी विरोधी पक्षात असतांना दिलेली आश्वासने व आजघडीला प्रलंबित असलेले प्रश्न याकडे लक्ष दिले तर ते प्रश्न आज पर्यंत का सुटले नाहीत? गेल्या कित्येक वर्षांपासून मते मिळविण्यासाठी राजकीय मंडळी आश्वासनांचा धुरळा उडवतात हे लक्षात येईल. आज घडीला मराठवाड्यातील ज्या ५ महानगरपालिकांसाठी यंदा व यापूर्वी आश्वासने दिली गेली, त्यामध्ये सर्वात महत्त्वाचा



प्रश्न म्हणजे पाणी, रस्ते, ड्रेनेज व पथदिवे हे होत. परंतु या प्रश्नावर बोलण्यासाठी किंवा हे प्रश्न सुटले की नाही, यावर कोणीही बोलण्यास तयार नव्हते. यंदाच्या महानगरपालिका निवडणुकीत पक्ष नेत्यांच्या एकमेकांवरील वैयक्तिक टीकेने लक्ष वेधले गेले. मराठवाड्यात असलेल्या पाच महानगरपालिकांमध्ये हा सगळीकडे समस्या सारख्याच आहेत. आज बेरोजगारांची संख्या दुर्लक्षून चालणार नाही. नवनवीन उद्योग सुरू करण्यासाठी मोजकीच शहरे निवडली जातात. शिक्षणाच्या बाबतीत कोणतीही महानगरपालिका उच्च दर्जाचे शिक्षण देऊ शकत नाही. महिलांच्या प्रश्नांवर कोणतीही महानगरपालिका कार्य करत नाही. आज घडीला आवश्यक असलेल्या समस्या सोडविण्याच्या बाबतीत एकाही पक्षाच्या जाहिरनाम्यात त्याचा उल्लेख नव्हता.शेवटी कशाच्या बळावर ही राजकारणी मंडळी मते मागत असतील, असा प्रश्न सर्व सुजाण मतदारांना पडला होता. शोकांतिका म्हणजे आजही मते मागणारी मंडळी तसेच विविध पक्ष जवळपास एकाच प्रश्नांच्या भोवती फिरत होती. निवडणूकीत मते मिळविण्यासाठी मतदारांना आश्वासन रुपी प्रलोभने दाखविली गेली. मराठवाड्यातील जनतेने मतदान करताना केंद्रात व राज्यात असलेल्या सत्ताधाऱ्यांकडून मराठवाड्याचा विकास होऊ शकतो , हे मात्र लक्षात ठेवले. यासाठी उमेदवार, त्यांचा भाग, शहर, परिसरातील समस्या यावर प्राधान्यक्रमाने जोर दिला गेला होता. भारत स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालेली आहेत. महाराष्ट्र गेल्या ७८ वर्षांपासून विविध निवडणूकीला सामोरे जातो. खरोखर जनतेचे प्रश्न सोडविण्यात हे पक्ष व पुढारी यशस्वी झालेले असतील तर त्यांना पुन्हा त्याच त्या मुद्यांवरून मतदारांच्या प्रश्नाला सामोरे जाण्याची वेळ आली नसती. आजही महानगरपालिकेची विकासकामांच्या बाबतीत जी अवस्था आहे, तशीच किंबहूना थोडी कमी-जास्त सर्वच महापालिकेची आहे. व जवळपास तशाच समस्या मराठवाड्यातील पाचही महानगरपालिका हद्दीतही नक्कीच सापडतील. ज्या समस्या गेल्या ७०-७५ वर्षांपासून भेडसावत आहेत. त्या समस्या आजही कायम आहेत. मग हे राजकारणी व पुढारी शेवटी करतात तरी काय? दिलेली आश्वासने कोणताही पक्ष पूर्ण करत नाही, असेच या इतिहासात घडलेल्या अनेक गोष्टीवरून सांगता येईल.त्यामुळे सर्वच पक्षांनी महानगरपालिका निवडणूकीच्या निमित्ताने आश्वासनांचा बाजार मांडला होता, हे मात्र निश्चित. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड ,लातूर, परभणी व जालना या ठिकाणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विशेष लक्ष ठेवले. जाहीर सभांमधून मतदारांना अपेक्षित असलेले कार्य व भविष्याचे भाजपचे योगदान काय असणार आहे, हे सांगितल्यामुळे भाजपच्या आशा पल्लवीत आहेत. मराठवाड्यातील महानगरपालिका कोणाच्या याकडे केवळ मराठवाड्याचेच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. आज सायंकाळपर्यंत मराठवाडा कोणाचा? हे स्पष्ट होणार असले तरी भाजपची मात्र मुसंडी राहील, मराठवाड्यात भाजप हा सर्वाधिक नगरसेवक निवडून आणणारा पक्ष राहील, यात शंका नाही.